दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३३२ | गुरूवार, दि.२७ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## खासदारांची चांदी ; भरलेल्या खिशात आणखी भर

केंद्र सरकारने खासदारांच्या वेतनात केलेली घसघशीत वाढ भुवया उंचावणारीच म्हटली पाहिजे. संसदीय कामकाज मंत्रालयाने जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार खासदारांच्या पगारात तब्बल २४ टक्के इतकी वाढ करण्यात आल्याचे दिसून येते. २०१८ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री अऊण जेटली यांनी खासदारांचे वेतन ५० हजारांवरून थेट १ लाख ऊपयांपर्यंत वाढवले होते. त्यानंतर पाच ते सात वर्षांतच खासदारांना इतकी मोठी पगारवाढ मिळणे, हे भरलेल्या खिशात आणखी भर टाकण्यासारखे ठरावे.

## दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री अतिशी यांना न्यायालयाची नोटीस

नवी दिल्लीः दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री अतिशी यांना बुधवारी (दि.२६) नोटीस बजावली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून त्यांच्या निवडणुकीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर न्यायालयाने अतिशी यांना नोटीस बजावली आहे. न्यायमूर्ती ज्योती सिंह यांनी केंद्रीय निवडणूक आयोग, दिल्ली पोलिस आणि कालकाजी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांनाही या याचिकेवर नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जुलैरोजी होणार आहे. कमलजीत सिंग दुग्गल आणि आयुष राणा यांनी अतिशी यांच्या आमदार म्हणून कालकाजी विधानसभा मतदारसंघातील निवडीला आव्हान दिले आहे. दोन्ही याचिकाकर्ते कालकाजी परिसरातील रहिवासी आहेत.

# कृषी निविष्ठांवरील जीएसटी रद्द होणार

### अर्थमंत्री सीतारामन यांनी दिले संकेत, असे झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**कृषी निविष्ठावरील वस्तु व सेवा कर म्हणजे जीएसटी रद्द करण्याची मागणी शेतकरी करत आहे. तसेच विविध राज्यातील सरकारांकडून आणि लोकप्रतिनिधीकडून कृषी निविष्ठावरील जीएसटी रद्द करण्याची मागणी केली जात. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बुधवारी (ता.२६) कृषी अवजारांवरील जीएसटी रद्द करण्याचे संकेत लोकसभेत बोलताना दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.**



ट्रॅक्टर, ठिंबक सिंचन, खत आणि किटकनाशक यावरील जीएसटी रद्द करण्याचा प्रस्ताव १७ सप्टेंबर २०२१ च्या जीएसटी परिषदेत आला होता. त्यावर चर्चा झाली, परंतु त्यावर एकमत निर्माण झालं नाही, असंही यावेळी अर्थमंत्री सीतारामन म्हणाल्या. तसेच यावर आता विचार सुरू आहे. त्यामुळे विचार करूनच निर्णय घेतला जाईल, असंही अर्थमंत्री सीतारामन यांनी सांगितले. यावेळी अर्थमंत्र्यांनी जीएसटी प्रारूपही स्पष्ट केलं. त्या म्हणाल्या, बियाण्यावर कोणतंही जीएसटी आकारलं जात नाही. तसेच, खतांवर ५ टक्के आणि अवजारांवर ५ टक्के जीएसटी आकारला जातो. तर ट्रॅक्टरवर १२ टक्के आणि कृषी पंपावर १२ टक्के जीएसटी आकरला जात असल्याचं मंत्री सीतारामन यांनी स्पष्ट केले. शेती निविष्ठावरील जीएसटी रद्द करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. यावर विधिमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनात पान २ वर

## थोडक्यात...

### विधानसभा उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे

मुंबई-अण्णा बनसोडेंची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्यांचे अभिनंदन केले. फडणवीसांनी बनसोडेंच्या निवडीचा प्रस्ताव मांडल्यानंतर एकमताने त्यांची निवड झाली. या प्रस्तावाला एकनाथ शिंदेंकडून अनुमोदन देण्यात आले.

### विधानसभेत अचानक बत्तीगुल

मुंबई-विधानसभेतील वीजपुरवठा खंडीत झाला आहे. कामकाज सुरु असताना अचानक बत्तीगुल झाल्याने विधानसभेचे कामकाज रखडले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. या शेवटच्या दिवशी वीजपुरवठा खंडीत झाल्याने कामकाज थांबवण्यात आले होते.

### उष्माघाताचा पहिला बळी

छत्रपती संभाजीनगर -जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात ३९ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले होते. या वाढत असलेल्या तापमानामुळे सोयगाव तालुक्यात पहिला बळी गेला आहे. निमखेडी बस थांब्यावरील ही घटना असून उन्हात बस थांब्यात विसावा घेणाऱ्या एका प्रवाशाचा उष्मघातामुळे मृत्यू झाला आहे. अमोल दामोदर बावस्कर असे उष्मघातामुळे मृत्यू झालेल्या २५ वर्षीय तरुणाचे नाव आहे.

### कुंभमेळ्याच्या नामकरणाचा वाद टोकाला

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नामकरणाचा वाद टोकाला गेला आहे. नाशिकचे महंत सुधीरदास नकली, त्यांचा आखाड्यांशी काय संबंध? महंत सुधीरदास यांनी महामंडलेश्वर पद कुठून आणलं? असा प्रश्न त्र्यंबकेश्वरच्या आनंद आखाड्याचे शंकरानंद सरस्वती महाराज यांनी उपस्थित केला.

### वाघ्याचे पुरावे एकाही इतिहासकाराने सांगितले नाही -संभाजी राजे

रायगड-वाघ्या कुत्र्याच्या अस्तित्वाबद्दलचे कोणतेही पुरावे नाहीत. कोणत्याही इतिहासकारांनी त्याबाबतचे पुरावे दिले नाहीत. इतिहासकारही तसे पुरावे देऊ शकले नाहीत, असे सांगतानाच रायगडावरील कुत्र्याची समाधी हटवण्यासाठी मी पत्र लिहिले होते, असे संभाजी महाराजांनी स्पष्ट केले आहे. माजी खासदार संभाजी छत्रपती यांनी पत्रकार परिषद घेऊन ही मागणी केली.

### सोलापूर जिल्ह्याला अवकाळीने झोडपले

सोलापूर-अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे बार्शी तालुक्यातील राळेरासमधील टरबूज बाग मातीमोल झाली. एकीकडे सोलापूर जिल्ह्यातील तापमान दिवासेंदिवस चाळीशीच्या पल्याड जातं असल्याने फळपिकांना तग धरणे झाले होते. मुश्किल त्यात अचानक आलेल्या पावसामुळे टरबूज बागा नेसस्तनाबूत झाल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाल्याचे चित्र सध्या सोलापूर जिल्ह्यात दिसून येत आहे.

# सुदर्शन घुले गँग लिडर तर वाल्मिक कराड मास्टरमाईंड

### संतोष देशमुख खून प्रकरण: उज्वल निकम यांच्या उपस्थितीतील पहिली सुनावणी







**बीड । प्रतिनिधी**

**विशेष सरकारी वकिल उज्वल निकम यांच्या उपस्थितीत संतोष देशमुख खून प्रकरणाची पहिली सुनावणी बुधवार पार पडली. या प्रकरणात सुदर्शन घुले हा गँग लिडर तर वाल्मिक कराड हा मास्टरमाईंड असल्याचे न्यायालयासमोर ॲड. निकम यांनी सांगितले.**

शासनाने संतोष देशमुख खून प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती केली. पहिल्या सुनावणीला निकम हे गैरहजर होते, तर दुसऱ्या सुनावणीला ते हजर राहीले. न्यायालयात त्यांनी संतोष देशमुख खून प्रकरणाचा घटनाक्रम सविस्तरपणे पान २ वर

#### वाल्मिक कराडकडून आरोप मुक्ततेसाठी अर्ज

मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड याला या संपूर्ण घटनेचा मास्टरमाइंड म्हणून अटक करण्यात आलेली आहे. धनंजय मुंडे यांचा अत्यंत निकटवर्ती समजला जाणारा वाल्मिक कराड याने खंडणी प्रकरणात संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा कट रचल्याचं तपासातून पुढे आलं आहे. त्याच्यावर मकोका देखील लावण्यात आलेला आहे. त्यानंतर आता वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे यांच्याकडून कराडची आरोपातून मुक्तता केली जावी यासाठी न्यायालयात अर्ज सादर करण्यात आलेला आहे. आम्हाला हे आरोप मान्य नसल्याचे कराडच्या वकिलांनी म्हटले आहे.

## वाघ्याची कथा सत्य, संभाजीराजे चूक-संभाजी भिडे

**सांगली । प्रतिनिधी**



रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीवरून वाद सुरू असून, संभाजीराजे छत्रपती यांनी त्याला ऐतिहासिक आधार नसल्याचा दावा करत ३१ मेपर्यंत पुतळा हटवण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. यावर भिडे म्हणाले, "संभाजीराजे जे बोलतात ते चुकीचे आहे. वाघ्याची कथा खरी आहे. त्याने शिवाजी महाराजांच्या चितेत उडी घेतली होती. त्या काळात माणसांपेक्षा कुत्री जास्त एकनिष्ठ होती, हे दाखवण्यासाठी हा पुतळा गरजेचा आहे, असे भिडे म्हणाले.

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कुणाल कामरा प्रकरणाने चांगलाच गदारोळ माजवला. सत्ताधारी आणि विरोधकांनी सभागृहात या मुद्द्यावरून प्रचंड गोंधळ घातला. या प्रकरणावर संभाजी भिडे गुरुजी यांनी तीव्र प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे. "कुणाल कामरावरून विधानसभेत गोंधळ घालणारे सगळे देशद्रोही आहेत," अस ते म्हणाले. याशिवाय, रायगडच्या पान २ वर

## सत्तर विरोधी खासदार लोकसभा अध्यक्षांच्या दारी

### ओम बिर्ला यांनी राहुल गांधी यांना बोलण्याची परवानगी नाकारल्याने संताप



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

लोकसभेचे उपनेते गौरव गोगोई, काँग्रेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल आणि काँग्रेसचे व्हीप माणिकम टागोर आणि इतर ७० जणांसह काँग्रेसच्या लोकसभेतील खासदारांनी बुधवारी (२६ मार्च २०२५) लोकसभा अध्यक्षांची भेट घेतली आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सभागृहात संधी नाकारल्याचा मुद्दा उपस्थित केला.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी बुधवारी राहुल गांधी यांना सभागृहाची प्रतिष्ठा राखण्यासाठी सदस्यांनी पाळणे अपेक्षित असलेल्या प्रक्रियेच्या नियमांचे पालन करण्यास सांगितले. सभापतींनी असे निरीक्षण पान २ वर

## पैंसे घेतल्याने पीएसआय रणजीत कासले निलंबित

### एसपी नवणीत काँवत यांची कारवाई; कासलेकडून अधिकारी, नेत्यांवर आरोप

**बीड । प्रतिनिधी**

**पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी जिल्हा पोलीस दलातील आणखी एका अधिकाऱ्याचे निलंबन केले आहे. तपासाकरता परराज्यात गेले असताना पैसे घेतानाचा व्हिडिओ समोर आला होता. निलंबनाचा आदेश येताच पोलीस अधिकाऱ्यांसह राजकीय नेत्यांवर निलंबित पोलीस अधिकाऱ्याने आरोप केले आहेत. पीएसआय रणजीत कासले असे निलंबीत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे.**

बीड पोलीस दलात आता एका पीएसआयचे निलंबन करण्यात पान २ वर

#### तृप्ती देसाई यांच्याकडून आरोप

बीड जिल्ह्यातील ६ अधिकारी आणि २० कर्मचाऱ्यांची वाल्मिक कराडशी जवळीक होती, असा आरोप करत सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी तक्रार केली होती. माझ्याकडे या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे अनेक पुरावे ऑडिओ, व्हिडिओ स्वरूपात उपलब्ध आहेत. हे सर्व पुरावे घेऊन मी बीडला जाणार असल्याची माहिती देखील तृप्ती देसाई यांनी दिली होती.

#### धनंजय मुंडे यांचे नाव घेत कासलेचा कांगावा

पीएसआय रणजीत कासले यांना निलंबित केल्यावर त्यांनी एकामागून एक व्हिडिओ व्हायरल करीत माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळे आरोप करीत कांगावा करण्याचा प्रयत्न केला आहे. निलंबन झाल्यावरच हे आरोप केले जात असल्याने कासले यांच्या भुमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

## ऊसतोड कामगारांसाठी टास्क फोर्स स्थापन होणार

### उपसभापती निलम गोऱ्हे यांचे निर्देश; बीडच्या महिलांसंदर्भातील अहवाल सादर





**मुंबई । प्रतिनिधी**

**ऊसतोड कामगारांच्या आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी एक टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार असून यासंदर्भात विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी निर्देश दिले आहेत. तसेच बीडच्या उसतोड महिला कामगारांसंदर्भातील अहवाल सुध्दा सादर करण्यात आला आहे.**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया प्रकरणी गठीत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागाने केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी बुधवारी पुन्हा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्पष्ट निर्देश दिले की, ऊसतोड कामगार महामंडळ कार्यरत असल्याने सामाजिक न्याय विभागाने पान २ वर

## झाडे तोडणे हे मनुष्य हेत्येपेक्षाही भयंकर!

### अवैध वृक्षतोड केल्यास प्रत्येक झाडासाठी १ लाख रुपयांचा दंड वसूल करा - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**मोठ्या प्रमाणात झाडे तोडणे हे मनुष्याच्या हत्येपेक्षाही घातक आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्यांवर दया दाखवली जाऊ नये, असे न्यायालयाने म्हटले. बेकायदेशीरपणे कापलेल्या प्रत्येक झाडासाठी १ लाख रुपये दंड आकारण्यास न्यायलयाने मान्यता दिली. संबंधित अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे झाडे तोडणाऱ्या आणि पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे असे न्यायालयाने म्हटले.**

न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने संरक्षित ताज ट्रॅपेझियम झोनमध्ये ४५४ झाडे तोडणाऱ्या व्यक्तीची दंडाविरुद्धची याचिका फेटाळून लावली. गेल्या वर्षी शिवशंकर अग्रवाल यांनी तोडलेल्या ४५४ झाडांसाठी प्रति झाड १ लाख रुपये (एकूण - ४.५४ कोटी रुपये) दंड ठोठावण्यात आला होता, यासंबंधीचा केंद्रीय सक्षम समितीचा (सीईसी) अहवाल न्यायालयाने पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ मार्च २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८२.५० क्विंटल | २,२०० | २,८५२ | २,५५४ |
| ज्वारी/हायब्रिड: २८१.०० क्विंटल | १,९०० | २,९५१ | २,३७८ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.५० क्विंटल | ६,९५० | ७,००० | ६,९७५ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६७.५० क्विंटल | २,०३३ | ३,००० | २,६३६ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ९.०० क्विंटल | ४,००० | ४,०२५ | ४,०१२ |
| हरभरा: ४५.५० क्विंटल | ५,१०० | ५,३०० | ५,२२३ |


# एसटीला चांगले दिवस येणार; बसेसमध्ये मोठा बदल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितला प्लॅन; ५ हजार बस खरेदी करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

एस टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करण्यात येणार आहेत. एसटीच्या बसेस इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. येत्या काळात ५ हजार १५० ईलेक्ट्रिक बस खरेदी केल्या जाणार असल्याचे आगामी काळात एसटीला चांगले दिवस येणार असल्याचे संकेत आहेत.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस अजूनही राज्यातील नागरिकांचे परिवहनाचे सर्वात मोठे साधन आहे. गाव ते एसटी पान २ वर



#### सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रीक होणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रीक करण्यात येणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, आमदारांनाही देण्यात येणाऱ्या वाहन कर्जावरील व्याज सवलतीही ईव्हीसाठीच देण्यात येतील. सर्व मंत्री यांची वाहनेही ईव्हीमध्ये बदलण्याचे शासनाचे नियोजन आहे.

#### ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर मागे

राज्यात मोठ्या प्रमाणावर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये ३० लाखापेक्षा जास्त किमतीच्या ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर आकारण्याचे जाहीर केले आहे. परंतु हा कर मागे घेण्याची घोषणा सभागृहात करण्यात येणार आहे. राज्यातील रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान ८० टक्के ईव्ही वाहने होतील यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढला की प्रदूषण कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होईल. जास्तीत जास्त ईव्ही बसेस घेण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषण मुक्त असावी असे शासनाचे धोरण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



## अग्रलेख

# खासदारांची चांदी ; भरलेल्या खिशात आणखी भर

केंद्र सरकारने खासदारांच्या वेतनात केलेली घसघशीत वाढ भुवया उंचावणारीच म्हटली पाहिजे. संसदीय कामकाज मंत्रालयाने जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार खासदारांच्या पगारात तब्बल २४ टक्के इतकी वाढ करण्यात आल्याचे दिसून येते. २०१८ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री अऊण जेटली यांनी खासदारांचे वेतन ५० हजारांवरून थेट १ लाख ऊपयांपर्यंत वाढवले होते. त्यानंतर पाच ते सात वर्षांतच खासदारांना इतकी मोठी पगारवाढ मिळणे, हे भरलेल्या खिशात आणखी भर टाकण्यासारखे ठरावे. संसदीय लोकशाहीत खासदार वा लोकप्रतिनिधींचे स्थान अतिशय महत्त्वाचे होय. दूरवर पसरलेला मतदारसंघ, तेथील भौगोलिक स्थिती, नागरीकरण व इतर प्रश्न लक्षात घेता खासदारांपुढे अनेक आव्हाने असतात, याबाबतही दुमत होण्याचे कारण नाही. तथापि, यातील किती खासदार आपापल्या मतदारसंघातील प्रश्नांना प्रामाणिकपणे भिडतात, मतदारसंघामध्ये उपलब्ध निधी खर्च करतात, हा संशोधनाचा विषय ठरतो. खरे तर संबंधित लोकप्रतिनिधी वा खासदाराकडे आपापल्या मतदारसंघाचे पालकत्व असते. या न्यायाने पोटच्या मुलाप्रमाणे त्यांनी आपल्या मतदारसंघाची, तेथील लोकांची काळजी वहायला हवी. केंद्राशी संबंधित प्रश्नांच्या सोडवणुकीबरोबरच लोकांच्या अडीअडचणीत धावून जायला हवे. परंतु, काही अपवाद वगळता कितीतरी लोकप्रतिनिधी हे कर्तव्य बजावण्यास कसूर करतात. त्यामुळे कोणत्याही परफॉर्मन्सशिवाय त्यांना इतकी पगार वाढ देणे योग्य आहे का, असा प्रश्न सामान्य माणसाला पडल्यावाचून राहत नाही. कालपरवापर्यंत खासदारांचे मासिक वेतन १ लाख ऊपये इतके होते. ते वाढल्याने हे वेतन १ लाख २४ हजारांपर्यंत पोहोचले आहे. त्याच वेळी खासदारांचा दैनिक भत्ता दोन हजार ऊपयांवरून २५०० इतका करण्यात आला आहे. याशिवाय कितीतरी सोयीसुविधा या खासदार महाशयांना वर्षानुवर्षे देण्यात येतात. बंगला, १.७० लाखांपर्यंत दूरध्वनी कॉल, ५० हजार युनिटपर्यंत वीज, ४० लाख लिटरपर्यंत पाणी तसेच अधिवेशन काळात व संसदीय समित्यांच्या बैठकांच्या काळात विमान प्रवास व प्रथमश्रेणी रेल्वे प्रवासही या मंडळींकरिता मोफत आहे. मुख्य म्हणजे त्यांच्या वेतनावर कोणताही कर लागू नाही. खासदार हे लोकांचे प्रतिनिधी असतात. ते लोकांकरिता, मतदारसंघाकरिता काम करतात. म्हणूनच त्यांच्यावर अशी सुविधांची खैरात करण्यात येते. परंतु, प्रत्यक्षात हे खासदार या सगळ्या सुविधांचा लोककल्याणाकरिता किती आणि कसा उपयोग करतात, हा प्रश्नच आहे. वास्तविक वाढती महागाई ध्यानात घेऊन सरकारने सदस्यांचे वेतन, भत्ते, पेन्शन कायदा, १९५४ अंतर्गत वेतन आणि पेन्शनमध्ये सुधारणा केली आहे. त्याचा लाभ माजी खासदारांनाही होणार असून, त्यांची पेन्शनही ३१ हजार ऊपयांपर्यंत वाढेल. लोकसभा आणि राज्यसभेतील खासदारांचा विचार करता तशी ही संख्या छोटी नाही. लोकसभेत एकूण ५४३ इतके खासदार आहेत. तर राज्यसभेतील खासदारांची संख्या २४५ इतकी आहे. यात नामनिर्देशित सदस्यांची संख्या अनुक्रमे २ व १२ इतकी आहे. माजी खासदारांची संख्या विचारात घेतल्यास हा आकडा कितीतरी मोठा होतो. वेतन, भत्ते आणि पेन्शनमध्ये वाढ झाल्याने केंद्र सरकारच्या तिजोरीवर किती आर्थिक ताण पडणार, याची कल्पनाच केलेली बरी. ही सुधारित वेतनश्रेणी १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे. त्यामुळे ही लागू केलेली वाढ देताना केंद्र सरकारची दमछाक होऊ शकते. वास्तविक, खासदारांचे पगार वाढले म्हणून कुणाला दु:ख व्हायचे कारण नाही. खासदारांपुढे अनेक जबाबदाऱ्या असतात. समस्यांचे डोंगर असतात. त्यांना मतदारसंघात फिरावे लागते. लोकांशी संपर्क साधावा लागतो. या सगळ्याचा विचार करता त्यांच्या पगारास कुणाचा विरोध असू नये. मात्र, बरेचशे खासदार कामापेक्षा नको त्या गोष्टीत रस घेतात. विविध प्रश्नांचा अभ्यास करून खासदारांनी सभागृहात भूमिका मांडणे वा विविध गेष्टींचा पाठपुरावा करणे अभिप्रेत असते. त्याऐवजी अलीकडे खासदार मंडळी गोंधळ घालण्यात, सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यातच धन्यता मानतात. खासदार सत्ताधारी पक्षाचे असोत वा विरोधी पक्षाचे. जबाबदारी काम करण्याचे या मंडळींना वावडे असते काय, असा प्रश्न पडतो. एकेकाळी भारताच्या संसदेत अतिशय प्रगल्भ, अभ्यासू आणि जनहिताची चाड असणाऱ्या खासदारांचा भरणा होता. तथापि, मागच्या काही दशकांत हा आलेख घसरत असल्याचे दिसून येते. कलंकित खासदारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. निवडून येण्याची क्षमता हा निकष लक्षात घेऊन सर्वच पक्ष अशा कलंकित खासदारांना आपलेसे करताना दिसतात. अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या या नेत्यांना रेड कार्पेट टाकल्यानेच राजकारणाचे गुन्हेगारीकरण टीपेला पोहोचले आहे. ज्यांचे मूळच अनीतीवर पोसले आहे, ते काम तरी काय करणार? उलटपक्षी त्यामुळे गुंडगिरीसारख्या समस्या वाढत आहेत. राजकारण्यांनी पोसलेले गुंड आणि त्यांचा उच्छाद काय असतो, याचा अनुभव महाराष्ट्रासारखे सुसंस्कृत राज्य सध्या वारंवार घेत आहे. अर्थात सगळेच खासदार वाईट नाहीत, हेही खरेच. आजही भारताच्या संसदेत अनेक बुद्धिमान, जनहितदक्ष आणि सुसंस्कृत विचारांचे खासदार आहेत. मात्र, त्यांची संख्या कमी आहे, हे वेगळे सांगायला नको. म्हणूनच खासदारांचा पगार वाढतो, तेव्हा सामान्य माणसाच्या मनात यांचा पगार कशाला वाढवायचा पाहिजे, असा सवाल उत्पन्न होतो. अंतिमत: हा पगार जनतेच्या पैशातूनच उभा राहतो. त्यामुळे 'ही मंडळी असे काय काम करतात,' अशी शंका लोकच घेत असतील, तर ती बाजूही समजून घ्यायला हवी. आजमितीला जग प्रचंड वेगाने बदलत आहे. या सगळ्या कोलाहलात लोकांभोवतीचे प्रश्न गुंतागुंतीचे बनले आहेत. बेरोजगारी, महागाई, गुंडगिरी, अस्थिरता यामुळे समाजमन अस्वस्थ आहेत. हे लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनी समाजमन समजून घ्यायला हवे. आपला मतदारसंघ शांत, सुरक्षित आणि विकसित कसा करता येईल, यावर लक्ष ठेवायला हवे. खासदारांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडले, तर त्यांच्या वेतनास सर्वसामान्यांचाही पाठिंबाच असेल.

## शिक्षकाच्या पत्नीचा शेतामध्ये खून

**घनसावंगी । प्रतिनिधी**



घनसावंगी तालुक्यातील अंतरवाली टेंभी शिवारात मंगळवारी (दि.२५) मार्च रोजी जिल्हा परिषद शाळेचा शिक्षकांच्या पत्नीचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. मृत महिलेचे नाव मीरा राजकुमार बोंडारे (वय ४२) असून, त्या शेतात कामासाठी गेल्या होत्या. दुपारच्या सुमारास झाडाखाली विश्रांती घेत असताना त्यांच्यावर दगडाने हल्ला करण्यात आला. मारेकऱ्यांनी केलेल्या हल्ल्यात त्यांचा चेहरा पूर्णपणे छिन्नविच्छिन्न झाला. शिक्षक पत्नी असलेल्या मीरा बोंडारे यांच्या खुनामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या विवाहितेचा खुन प्रकरणी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आला.दि २४ मार्च रोजी विवाहितेचा भर दुपारी दगडाने ठेसून खून केल्याची घटनेमुळे खळबळ उडाली व त्या घटनेचे पडसाद आज विधिमंडळात उपस्थित झाले अधिक माहिती अशी की मीरा राजकुमार बोडारे वय ४० नेहमीप्रमाणे शेती कामानिमित्त शेतामध्ये गेले असता दुपारी अध्यात व्यक्तींनी त्यांचा निर्घुण खून केल्याची घटना उघडकीस झाली त्यांना त्यांच्याच शेतामध्ये त्यांच्या डोक्यावर दगडाने व स्टीलच्या ग्लासने मार देऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला या प्रकरणी तीर्थपुरी येथील पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन घटनेची पाहणी करताच या तपासाची चक्र फिरवली आहेत मात्र अद्यापही या घटनेचे कारण समोर आलेले नाही क्या महिलेचा मृतदेह तीर्थपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पोस्टमार्टम साठी आणण्यात आला होता मात्र नातेवाईकांनी गुन्हेगाराचा तपास लागेपर्यंत अंत्यविधी होणार नसल्याचे सांगत आज माजी आ.राजेश टोपे यांनी तीर्थपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन भेट देऊन सर्व नातेवाईकांना आश्वासित केल्यानंतर मृत व्यक्तीवर अंत्यविधी करण्यात आला व तसेच जयंत पाटील व घनसावंगी चे आमदार हिकमत उढाण यांनी सभागृहामध्ये या घटनेची सखोल चौकशी होऊन या घटनेत जो दोषी असेल त्याच्यावर तात्काळ कार्यवाही करावी अशी देखील मागणी करण्यात आली या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पत्रकारांनो सावधान; तुम्हाला २५० कोटींचा दंड होऊ शकतो

**'विशेष जनसुरक्षा कायद्याचा'' बडगा राज्य सरकार महाराष्ट्रातील पत्रकार आणि जनतेवर उगारू पहात आहे.. सरकारचा हा कायदा रोखायचा कसा? यावर चर्चा आणि विचारविनिमय करण्यासाठी मुंबईतील पत्रकारांच्या नऊ संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक कालच आम्ही मुंबई मराठी पत्रकार संघात घेतली. या कायद्याचे परिणाम काय होणार आहेत हे आम्ही समजून घेत असतानाच केंद्र सरकार पत्रकारितेवरच बुलडोजर (ही विद्यमान सरकारची आवडती मशिनरी आहे म्हणून हा ऊल्लेख) फिरवणारा डीपीडीपी अर्थात लागू करू पहात आहे..**

आपल्या जनसुरक्षा कायद्यापेक्षा किती तरी पटीनं जालिम असा कायदा आहे.. या कायद्याचं उल्लंघन करणारया पत्रकारांना किंवा कोणालाही किती दंडाची तरतूद या कायद्यात आहे, माहिती आहे..?

**तब्बल २५० कोटी**

**हो २५० कोटी रूपये..**

ही रक्कम भरली नाही तर तो दंड ५०० कोटींचा होऊ शकतो.. या देशात नागरिकांचं सरासरी उत्पन्न ५००० रूपये देखील नाही.. पत्रकारांचे पगार ५०,००० हजार पेक्षाही कमी आहेत, त्यांना जर २५० कोटींचा दंड आकारला जाणार असेल तर कोण आणि कश्यासाठी पत्रकारिता करेल? हा दंड ज्या पत्रकारावर, नागरिकावर बसेल तो, पुढील पाच-पंचवीस पिढ्या देखील ही रक्कम भरू शकणार नाही.. हे नक्की.. मग तुरूंगात खितपत पडावं लागेल.. दहशत बसविणे हाच या कायद्याचा उद्देश आहे.. नाही तर २५० कोटींचा दंड कसा लावला जाईल? इंग्रजांच्या काळात आणि आणीबाणीतही असं घडलं नव्हतं.. व्यक्तीगत माहितीचं संरक्षण करण्याबाबत कुणाचं दुमत नाही, पण अनुमती शिवाय कोणाचं नावंही छापता येणार नाही.. म्हणजे एखाद्यानं भ्रष्टाचार केला, त्याची पुराव्यासह माहिती तुमच्याकडं असेल तरीही संबंधित व्यक्तीची परवानगी घ्यावी लागेल.. जो आरोपी आहे तो काय म्हणून अशी परवानगी देईल? नक्कीच देणार नाही.. मग बातमी काय आणि कशी छापायची? की फक्त हवा - पाण्याच्या आणि फुला - फळांच्याच बातम्या देत छापायच्या? सरकारला तेच वाटतंय.. डीपीडीपी मुळे माहितीचा अधिकार कायदा देखील गुंडाळला जाणार आहे.. म्हणजे हा कायदा अर्थहीन ठरेल.. माहितीच्या अधिकाराखाली दरवर्षी ६० लाख अर्ज केले जातात.. त्यातून मिळालेली माहिती आरटीआय कार्यकर्ते प्रसिध्द करतात.. पण हा कायदा लागू झाला तर अशी माहिती संबंधित व्यक्तीच्या परवानगीशिवाय तुम्ही प्रसिध्द करू शकणार नाहीत.. केलीच तर २५० कोटींचा दंड आहेच.. गंमत बघा, आपल्यावर हजार निर्बंध.. पण विविध कंपन्या आपला जो डेटा चोरतात त्याबद्दल कायद्यात कोणतीच तरतूद नाही.. डिजिटल व्यक्तीगत डेटा संरक्षण अधिनियम २०२३ मध्ये मंजूर झाला.. त्याला ११ ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रपतींनी मंजुरी दिली.. आता हा कायदा लागू करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.. हा कायदा लागू झाला तर भ्रष्टाचार, मनमानी बोकाळेल, त्याविरोधात कोणीच आवाज उठवू शकणार नाही.. म्हणूनच कायद्याला संघटीत विरोध झाला पाहिजे.. विरोध तीव्र असेल तर सरकार माघार घेते हे वारंवार दिसले आहे.. इंदिरा गांधी यांना खूष करण्यासाठी जगन्नाथ मिश्र यांनी बिहारमध्ये १९८२ मध्ये बिहार प्रेस बिल आणले होते.. देशभर त्याला विरोध झाला.. -जगन्नाथ मिश्र यांना माघार घ्यावी लागली.. राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी २०१७ मध्ये बिहार प्रेस बिलाच्या धर्तीवरच बिल आणून न्यायमूर्ती, लोकप्रतिनिधी, भूतपूर्व लोकप्रतिनिधी यांना कायद्यानं संरक्षण देण्याचा प्रयत्न केला होता.. त्यालाही विरोध झाला.. वसुंधरा राजे यांना माघार घ्यावी लागली.. तेव्हा माघार घ्यावी लागली म्हणून आता मोदी सरकार लागू करत आहे..असं दिसतंय.. हा कायदा कोणालाच सूट देत नाही.. विरोधी पक्षांचे मिडिया सेल देखील याला अपवाद नाहीत.. कोणावरही डेटा फ्युडिशियरी म्हणून कायद्याचा बडगा उगारला जाऊ शकतो.. लोकशाहीसाठी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी आणि देशाची हुकूमशाहीकडे सुरू झालेली वाटचाल रोखण्यासाठी कायद्याला विरोध करावाच लागेल.. माझा या आणि अशा सर्वच कायद्यांना विरोध आहे.. आपलाही विरोध नोंदवा..



**एस.एम.देशमुख**

## जालना महापालिकेत लवकरच ई-ऑफिस कार्यान्वीत होणार

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महापालिका मध्ये महाराष्ट्र शासन व यांनी विकसित केलेली ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वीत करण्या करिता प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षण हे अणासाहेब वाघमारे, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक, महाआयटी व रवींद्र सोनवणे, ई-ऑफिस तज्ञ यांनी प्रशिक्षण दिले यावेळी जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी जालना शहर महापालिका मध्ये येणाऱ्या ०१ एप्रिल पासून पहिल्या टप्प्यात दैनदिन येणारे सर्व टपाल हे ई-ऑफिस प्रणाली व्दारे कार्यालयात नोंदविण्यात येऊनच कार्यालयात वितरित करण्यात येणार व तदनंतर लगेच ई-ऑफिस प्रणाली पूर्ण क्षमतेने सर्व कार्यालयात अंमलबजावणी करण्यात येणार आहे असे प्रतिपादन केले. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रियांका राजपूत, उपायुक्त नंदा गायकवाड आणि सर्व सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख आणि महापालिकेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.



## भगवंताचे नामस्मरण करण्यातच मानवी देहाचे सफलत्व-ह.भ.प.श्रीहरी पुरी महाराज

**आष्टी । प्रतिनिधी**

मानवी जीवन हे केवळ भोगासाठी नाही आणि त्यागासाठीही नाही, मानवी जीवनात आपल्या वाटेला आलेले कर्म करताना सतत भगवंतांचे नामस्मरण असणं हेच मानवी देहाचे सफलत्व आहे. असे प्रतिपादन ह.भ. प.श्रीहरी पुरी महाराज यांनी केले.

तवलवाडी येथील आष्टी तालुका दूध पुरवठा व उत्पादक सहकारी संघाचे सेवानिवृत्त कार्यकारी संचालक सोमनाथ तवले पाटील यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई पंढरीनाथ तवले पाटील यांच्या दशक्रिया विधी मध्ये प्रवचन सेवेमध्ये ते बोलत होते . श्रीहरी पुरी महाराज यांनी ज्ञानेश्वरीतील बाराव्या अध्यायातील..'' ओवी तैसे येणेची शरीरे ,शरीरा येणे सरे, किंबहुना येरझारे, चिरापडे ही ओवी मानवी देहाचे महत्त्व प्रतिपादन करत असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले, मानवी देह हा देव दुर्लभ असा देह आहे मानवी देहाची इच्छा प्रत्यक्ष देव देखील करत असतात परंतु स्वर्गातील देवदेवांनी इच्छा करूनही त्यांना हा देह प्राप्त होत नाही असे सांगितले जाते भूतलावर असा एक वर्ग आहे की, त्यांना देह मिळाला नाही आणि कळाला सुद्धा नाही, ते म्हणजे पशु पक्षाचे जीवन आहे. कारण पशुपक्ष्यांच्या जीवनात कळंना नावाची गोष्ट नाही, त्यानंतरचा दुसरा वर्ग असा आहे की, त्यांना नरदेह मिळाला आहे आणि तो कळाला देखील आहे. हा वर्ग म्हणजे संत वर्ग आहे म्हणून संत म्हणतात ''धन्य आम्ही जन्मा आलो दास विठोबाचे झालो '' केवळ मानवी जन्माला आले ते धन्य नाहीत,तर जे दास विठोबाचे झाले ते धन्य जन्मा आले .. आणि तिसरा वर्ग असा आहे त्यांना देह मिळाला नाही परंतु कळाला आहे ते स्वर्गातील देव आहेत म्हणून ते या देहाला येण्याची इच्छा व्यक्त करत आहेत आणि इथे येऊन आम्ही भगवंताचे नामस्मरण करून जीवन मुक्त होऊ असे म्हणतात.. आणि चौथा वर्ग जो असा आहे तो म्हणजे तुमचा आमच्या सारख्या सर्वसाधारण मानव आपल्याला देह मिळाला परंतु कळालेला नाही म्हणजे हा मानवी देह ज्याच्यासाठी मिळाला त्याच्यासाठी वापर होत नाही म्हणून हा आपल्याला कळालेला नाही आणि ज्याच्यासाठी मिळाला त्याच्यासाठी वापर न होणे म्हणजे वाया जाणे आणि हा मानवी देह मिळून सुद्धा नामस्मरण भजन आणि भक्ती करण्यासाठी हा जर वापरला नाही तर तो जन्म वाया गेल्यासारखा आहे म्हणजे या मानवी देह धारण करून सुद्धा आपण जर नामस्मरण केले नाही तर आपण आपला जन्म वाया घालवत आहोत असे सांगून श्रीहरी पुरी महाराज शेवटी म्हणाले, मानवी जीवन हे केवळ भोगासाठी नाहीत आणि त्यागासाठी नाही मानवी जीवनात आपल्या वाट्याला आलेलं कर्म करताना भगवंतांचं नामस्मरण करणे हे मानवी देहाचे सफलत्व आहे आणि जो जन्माला आला आहे त्याचा मृत्यू देखील फोटो आहे आणि जी गोष्ट अटळ आहे जी टाळता येत नाही तिचा स्वीकार करणे हा पुरुषार्थ आहे असे सांगून मानवी देह हा ८४ लक्ष योनी नतर मिळत असतो त्यामुळे हा देव दुर्लभ मानवी देह सत्कारणी लावला पाहिजे चांगले विचार स्वीकारले पाहिजेत नामस्मरणाने सद्विचार निर्माण होतात असे प्रतिपादन करत त्यांनी आपल्या प्रवचन सेवेला विराम दिला. यावेळी कै. लक्ष्मीबाई पंढरीनाथ नवले पाटील यांच्या विषयी ह.भ.प.नानासाहेब तवले, महाराज, ह.भ.प. बाळू महाराज झगडे, ह.भ. प.दिनकर महाराज तांदळे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, ज्येष्ठविधीज्ञ मधुकर झांजे, युवा नेते राहुल जगताप सामाजिक कार्यकर्ते अहमद खान पठाण,सेवानिवृत्त शिक्षक काकडे,यांनी आदरांजली अर्पण केली.



## ग्रामपंचायत टाका येथे आरोग्य तपासणी

**अंबड । प्रतिनिधी**

२६ मार्च २५ अंबड तालुक्यातील ग्रामपंचायत टाका व प्रा.आ.के. वडीगोद्री अंतर्गत उपकेंद्र टाका यांच्या संयुक्त विद्यमाने, एक दिवस गावकऱ्याान सोबत (ग्राम दरबार) या उपक्रम मध्ये दि २५व२६ मार्च रोजी गावातील नागरिकांची आरोग्य तपासणी केली, या मध्ये वयोवृद्ध लोकांसाठी स्वतंत्र तपासणी आयोजित केली होती, गरोदरमातांची आरोग्य तपासणी व रक्ततपासणी, माता व बालकांचे लसीकरण, रक्तदाब तपासणी, नेत्र तपासणी, मौखिक आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते या उपक्रम मध्ये ग्रामस्थांना आजाराबाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले, ग्रामस्थानी विविध आजारांमध्ये काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन केले, वैयक्तिक स्वच्छता व शुद्ध पाणी पिण्याचे ग्रामस्थांना सांगण्यात आले जास्त उन्हामध्ये काम न करण्याचे व उष्माघात बाबत आरोग्य शिक्षण दिले सदरील कार्यक्रमास गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात हजार होते सदरील कार्यक्रमस मा. सरपंच श्री रामेश्वर वैद्य, तालुका आरोग्य अधिकारी श्री अनिल वाघमारे , पंचायत समिती विस्तार अधिकारी श्री बनाटे बापू, ग्रामसेवक श्री जि.बी हुसे, डॉ. लाहोटी, आरोग्य पर्यवेक्षक श्री चाळक, आरोग्य सहायक श्री अहिरे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ उगले , आरोग्य सहायक श्री निकम. श्री जरारे आरोग्य सेविका श्रीमती पठाण, आरोग्य सेवक मस्के, श्री सिरसाट . यावेळी सर्वांना आरोग्य तपासणी कार्यक्रमात मार्गदर्शन केले.

## खडकी शाळेच्या रणवीर पवारची नवोदय विद्यालय प्रवेशासाठी निवड

**खडकी । पतिनिधी**

**१८ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षेचा निकाल मंगळवार दिनांक २५ मार्च रोजी जाहीर झाला. कळंब तालुक्यातील खडकी गावच्या जिल्हा परिषद शाळेतील इ ५ वी वर्गात शिकत असलेल्या रणवीर राजेंद्र पवार याची नवोदय विद्यालय प्रवेशासाठी निवड झाली. त्याने आतापर्यंत माझा महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा,एन.एस.एस.ई., ज्युनिअर आय. ए.एस अशा सर्व परिक्षेत उज्वल यश संपादन करून त्याने शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.**



गेल्या वर्षी झालेल्या अबॅकस परिक्षेत त्याने राज्यात दुसरा क्रमांक मिळविण्याची कामगिरी केली आहे. त्याला वर्गशिक्षक तथा मुख्याध्यापक आनंद राणे, शिक्षक तात्यासाहेब सुरवसे, सुरेश जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्याचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारूती विटेकर, उपाध्यक्ष सौ कल्पना राखुंडे, सरपंच सौ अस्मिता राखुंडे, उपसरपंच श्री सुखदेव राखुंडे यांनी अभिनंदन केले.

## पान १ वरून...

### कृषी निविष्ठांवरील

एकनाथ खडसे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवारांनी जीएसटी परिषदेत जाण्याची संधी मिळाली तर हा मुद्दा तिथे उपस्थित करेल, असं आश्वासन दिलं होतं. शेतकऱ्यांकडूनही जीएसटी रद्द करण्याची मागणी केली जात. शेतकऱ्यांना यामुळे उत्पादन खर्चात दिलासा मिळेल, असं जाणकार सांगतात. दरम्यान, शेतकऱ्यांचं उत्पन्न सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे कमी होऊ लागलं आहे. त्यात कृषी निविष्ठावरील जीएसटीनं शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढला आहे. परिणामी जीएसटी रद्द करण्याची मागणी केली जात आहे. अर्थमंत्री सीतारामन यांनी यावर चर्चा करून निर्णय घेण्याची ग्वाही दिली आहे. त्यामुळे कृषी जीएसटीवरून चर्चा सुरू झाली आहे.

-------------

### वाघ्याची कथा सत्य,

वाघ्या कुत्र्याची कथा सत्य असून संभाजीराजे भोसले यांचे मत चुकीचे आहे, असा दावाही भिडेंनी केला.

**शिवरायांच्या इतिहासात कुठेही वाघ्या कुत्र्याचा उल्लेख नाही - संभाजीराजे छत्रपती**

दुर्गराज रायगडावर एका काल्पनिक दंतकथेतून तयार झालेले वाघ्या कुत्र्याचे स्मारक तिथून हटवावे, यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. याच विषयासंदर्भात बुधवारी पुरातत्व खात्याच्या महासंचालकांची भेट घेतली आणि त्यांना माहिती दिली, यासंदर्भात मुख्यमंत्र्याची पुन्हा भेट घेणार असल्याचे संभाजीराजे छत्रपती म्हणाले. तसेच वाघ्या कुत्र्याचे स्मारक छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीपेक्षा मोठी आहे, हे कोणत्याही शिवभक्तांना पटण्यासारखे नाही. वाघ्या कुत्र्याचे स्मारक संवैधनिक पद्धतीने आणि सगळ्यांना विचारात घेवून ते काढले जाईल, आम्ही कुठेही कायदा हाती घेणार नाही. यासाठी कुणाशीही चर्चा करण्याची तयारी आहे, हवे तर सरकारने इतिहासकार, सरकारचे प्रतिनिधी आणि संबंधित सर्वांची एक समिती स्थापन करून खुली चर्चा करावी, असे वक्तव्य माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी केले.

---------

### सुदर्शन घुले गँग लिडर तर

सांगितला. तसेच सुदर्शन घुले हाच गँग लिडर असून वाल्मिक कराड हा त्याला मार्गदर्शन करीत होता. त्यामुळे तो मास्टरमाईंड असल्याचे निकम यांनी न्यायालयात सांगितले. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेतला आरोपींना व्हिसीद्वारे हजर करण्यात आले. पुढील सुनावणी ही १० एप्रिल रोजी होणार आहे.

--------

### पैसे घेतल्याने पीएसआय

आले आहे. या अधिकाऱ्याने परराज्यात तपासाकरिता गेले असता तडजोड करत पैसे घेत असल्याचा व्हिडिओ समोर आला होता. यानंतर हा विषय राज्यस्तरापर्यंत पोहोचला होता. या प्रकरणाची चौकशी करत कासले यांच्या निलंबनाचे आदेश नवनीत काँवत यांनी काढले आहेत. दरम्यान निलंबनाचे आदेश निघताच कासले यांनी वेगवेगळे व्हिडिओ व्हायरल करत पोलीस अधिकारी तसेच विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांवर देखील आरोप करून या सगळ्यांची चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

----------

### सत्तर विरोधी खासदार

का केले हे लगेच स्पष्ट झाले नाही. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितले की, सदस्यांनी सभागृहाचा उच्च दर्जा आणि प्रतिष्ठा राखून ठेवणाऱ्या पद्धतीने वागावे अशी अपेक्षा आहे. माझ्या निदर्शनास अनेक उदाहरणे आली आहेत जिथे सदस्यांचे वर्तन उच्च दर्जांना अनुरूप नाही, असे सांगितले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला पुढे म्हणाले की, या सभागृहात वडील आणि मुलगी, आई आणि मुलगी, पती आणि पत्नी हे सदस्य आहेत. या संदर्भात, विरोधी पक्षनेत्याने नियम ३४९ नुसार स्वतःचे वर्तन करावे अशी माझी अपेक्षा आहे, सभागृहातील सदस्यांनी नियम पाळावे अशा नियमांशी संबंध आहे. पुढे बोलताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, ''विशेषतः, विरोधी पक्षनेत्याने नियमांनुसार स्वतःचे वर्तन करावे अशी अपेक्षा आहे,तशी सूचनाही विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना केली. आश्चर्यचकित होऊन राहुल गांधी बोलण्यासाठी उभे राहिले पण ओम बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज तहकूब केले.

**सभागृहाचे कामकाज ''अलोकतांत्रिक पद्धतीने'' होतेय - राहुल गांधी**

राहुल गांधी यांनी बाहेर पत्रकारांशी संवाद साधला आणि सांगितले की, सभागृहाचे कामकाज ''अलोकतांत्रिक पद्धतीने'' चालविले जात आहे. त्यांच्याबद्दल एक अप्रमाणित संदर्भ देण्यात आला होता. परंतु त्यांना बोलू दिले गेले नाही. यापूर्वी द्रमुक खासदारांनी घोषणाबाजी करणारे टी-शर्ट परिधान करून सभागृह तहकूब केले होते, तेव्हा सभापतींनी नाराजी व्यक्त केली होती. सभापतींनी असे पोशाख संसदीय कार्यपद्धतीच्या नियमांविरुद्ध असल्याचे म्हटले होते.

----------

### झाडे तोडणे हे मनुष्य

स्वीकारला. अग्रवाल यांचा खटला लढणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी खंडपीठाला सांगितले की, त्यांच्या अशिलाने आपली चूक मान्य केली आहे आणि माफी मागितली आहे. वकिलांनी न्यायालयाला दंडाची रक्कम कमी करण्याची विनंती केली. ते म्हणाले की, अग्रवाल यांना केवळ त्या जमिनीवरच नव्हे तर जवळपासच्या ठिकाणीही झाडे लावण्याची परवानगी देण्यात यावी. न्यायालयाने दंडाची रक्कम कमी करण्यास नकार दिला. जवळपासच्या भागात झाडे लावण्याची परवानगी देण्यात आली.

-----------

### ऊसतोड कामगारांसाठी टास्क

ऊसतोड कामगार महामंडळ आणि अन्य संबंधित विभागांच्या सहकार्याने सामाजिक न्याय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक टास्क फोर्स स्थापन करावा. ऊसतोड कामगारांसाठीच्या या टास्क फोर्सच्या स्थापनेमुळे ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करण्यास गती मिळेल, असा विश्वास गोऱ्हे यांनी व्यक्त केला आहे. तसेच, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या व समिती अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, असे निर्देशही डॉ. गोऱ्हे यांनी दिले आहेत.

------------

### एसटीला चांगले दिवस

अशी घोष वाक्य असलेल्या लालपरीची सुविधा ग्रामीण भागात सर्वत्र आहे. राज्यातील बसेसमधून प्रवास करणाऱ्यांना महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सुविधा दिल्या जातात. आता या एसटीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाची माहिती सभागृहात दिली. तसेच त्यासंदर्भातील भविष्यातील प्लॅन सांगितला आहे. एस टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करण्यात येणार आहेत. एसटीच्या बसेस इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले, एसटी महामंडळाकरिता ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्यात येणार आहे. यापैकी ४५० बसेस खरेदी केल्या आहेत. तसेच एसटीच्या सध्याच्या बसेस एलएनजीमध्ये परावर्तीत करण्यात येणार आहे. एलएनजी पुरवठा करण्यासाठी करार करण्यात आला आहे. राज्यात ईव्हीच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ईव्ही धोरण आणले आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. २७ मार्च २०२५





## साळेगाव येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील साळेगाव येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात आला आहे.

केज तालुक्यातील साळेगाव हे गाव केज तालुक्यातील अत्यंत महत्वाचे आणि प्रतिष्ठेचे समजले जाणारे गाव आहे. दलीत चळवळीत येथील कार्यकर्त्यांचे मोठे योगदान आहे. दि. २६ मार्च रोजी पहाटे ३:०० वा. च्या सुमारास सामाजिक साळेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहा समोर भरलेल्या चबुतऱ्यावर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्व रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी करीत आणि फटाक्यांची आतिषबाजी करीत प्रचंड जल्लोषात पुतळा बसविण्यात आला. सदर पुतळा हा सोनेरी रंगाचा असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकिलांच्या वेशातील अत्यंत सुबक आणि देखणा पुतळा आहे. दिवसभर आंबेडकर प्रेमींची दर्शनासाठी गर्दी झालेली होती. तर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला आहे.

# महाराष्ट्रात खाजगी प्लेसमेंट एजन्सींसाठी नवे नियम; विधेयक दोन्ही सभागृहात संमत

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील खाजगी प्लेसमेंट एजन्सींवर नियंत्रण आणण्यासाठी आणि युवकांना फसवणुकीपासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ हे विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केले असून, यामुळे राज्यातील नोकरी शोधणाऱ्या युवकांसाठी अधिक सुरक्षित आणि पारदर्शक प्रणाली तयार होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्या कारकिर्दीत युवकांच्या कौशल्य विकासासाठी, रोजगारासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विधानपरिषद सदस्यांनी महाराष्ट्र राज्यात रोजगार मेळाव्याची वाढलेली संख्या, त्याचा युवकांना होणार लाभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या संधी असे सर्व निर्णय दूरदर्शी व मार्गदर्शक ठरणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ आणण्याचा निर्णय सुद्धा ऐतिहासिक ठरेल असे विधानपरिषद सदस्यांनी नमूद केले. या विधेयकामुळे बनावट भरती प्रक्रियेतून होणारी बेरोजगारांची फसवणूक थांबवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून उमेदवारांचे रोजगारात्मक हित जोपासले जाईल.**

या विधेयकाबाबत बोलताना मंत्री श्री लोढा म्हणाले, ''माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी यांनी राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर प्रत्येक विभागाला १०० दिवसाचा कार्यक्रम तयार करण्यास सांगितले होते. कौशल्य विकास विभागाच्या १०० दिवस कार्यक्रमात सदर विधेयक असावे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि त्यानुसार आम्ही महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५ सादर करत आहोत. या विधेयकामुळे तरुणांच्या हक्कांचे संरक्षण होईल आणि प्लेसमेंट एजन्सीवर सुद्धा अंकुश राहील. आता प्रत्येक प्लेसमेंट एजन्सी सरकारच्या नोंदणीकृत चौकटीत असेल, त्यामुळे पारदर्शकता येईल आणि युवकांचा विश्वासही वाढेल.''

राज्यातील युवकांना देशातील आणि परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, पादयोजन संस्थांना सहकार्य करून त्यांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे तसेच संस्थानाच्या गुणवत्तापूर्वक कामांना प्रोत्साहन देणे हे सदर विधेयकाचे उद्दिष्ट आहे.

विधेयकातील ठळक बाबी

१. या आधी गुमास्ता परवान्याच्या आधारे एजन्सी सुरू करता येत होती, मात्र आता तसे करता येणार नाही. सर्व प्लेसमेंट एजन्सीजना शासनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी बंधनकारक असून, वैध नोंदणी प्रमाणपत्राशिवाय कार्य करता येणार नाही.

२. चुकीची माहिती, खोटी कागदपत्रे, फसवणूक, माहितीचा दुरुपयोग, नोकरी प्रदान करण्यास निष्फळ ठरणे किंवा नकार देणे, शासनाच्या नावाने लोकांना भटकावणे अशा बाबी समोर आल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाईल किंवा निलंबित केले जाईल.

३. नोंदणीशिवाय कामकाज करणाऱ्या संस्थांवर दंडात्मक कारवाई किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद देखील या विधेयकात आहेत.

४. सरकारने केवळ नियमनच नाही, तर रोजगार संधी वाढवण्यासाठीही पावले उचलली आहेत. नोंदणीकृत खाजगी प्लेसमेंट एजन्सींसोबत रोजगार मेळावे, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यशाळा आणि सेमिनार यासारखे अनेक कार्यक्रम कौशल्य विकास विभागाद्वारे भविष्यात घेण्यात येतील.

विधेयकामुळे महाराष्ट्रात नोकरी शोधणाऱ्या युवकांना अधिक संरक्षित आणि पारदर्शक प्लेसमेंट सेवा उपलब्ध होणार असून, खाजगी प्लेसमेंट एजन्सीच्या अनियमित कारभारावर नियंत्रण येणार आहे.

# महेश गायकवाड यांची उपायुक्त पदी निवड



## शहरातून दिल्या जात आहे शुभेच्छा

धारूर । प्रतिनिधी

**धारूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक महेश गायकवाड यांची सहाय्यक उपायुक्त पदी पदोन्नती झाली आहे.आदर्श मुख्याधिकारी म्हणून महेश गायकवाड यांची ओळख आहे.**

धारूर नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष प्रशासक तथा मुख्याधिकारी महेश गायकवाड यांची पदोन्नती होऊन सहाय्यक उपायुक्त पदी निवड झाली आहे. महेश गायकवाड यांनी धारूर नगर परिषदेत मुख्याधिकारी व प्रशासक अशा दोन जबाबदाऱ्या पार पाडत आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे केली आहेत. त्यांच्या प्रशासकीय कौशल्यामुळे शहरातील अनेक रखडलेले प्रश्न मार्गी लागले. त्यांच्या नेतृत्वाखाली शहरात स्वच्छता अभियान, विशेष करून अनेक वर्षापासून अडकलेली कुंडलिका पाईपलाईन यात मार्ग काढत नव्याने कोट्यवधी रुपयांची पाणी योजना मंजूर करून आणत प्रत्यक्ष काम देखील सुरू केले आहे. यामुळे येणाऱ्या दिवसांमध्ये शहराला मुबलक पाणी मिळणार आहे. या मुळे पाण्याचा धारुकरांचा कायमचा प्रश्न मिटणार आहे. तसेच त्यांची पदोन्नती होऊन ते सहाय्यक उपायुक्त या पदावर पदोनत्ती झाल्याने शहरातील नगरसेवक संतोष सिरसट, सुधीर शिनगारे, बाळासाहेब खामकर, बिभीषण गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नितीन शिनगारे, गणेश सावंत, ज्ञानेश्वर शिंदे, पत्रकार अतुल शिनगारे, सचिन थोरात, ईश्वर खामकर, संदीपान तोंडे, सूर्यकांत जगताप, सुनील कावळे, अविनाश ठोंबरे,सुनील तोंडे,यांनी शुभेच्छा दिल्या.

# दिंद्रुडचे १२ विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयाची ९ विद्यार्थी,जि.प.कें.प्राथमिक शाळेचे २ विद्यार्थी,अभिनव पब्लिक स्कूलचा १ विद्यार्थी असे एकूण १२ विद्यार्थी गढी येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता ६ वी साठी प्रवेश पात्र ठरले आहेत. त्यांच्या यशाबाबत पंचक्रोशीतुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**




जवाहर नवोदय विद्यालय हे केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करते. या विद्यालयात शिक्षण घेतलेला विद्यार्थी जीवनात सार्वभौम नागरिक बनण्यास पात्र ठरत असल्याचे दिसत आहे. गेल्या काही वर्षात माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील शेकडो विद्यार्थी या विद्यालयात प्रवेश पात्र ठरले आहेत. सन २०२५-२६ च्या प्रवेश पात्र पुर्व परीक्षेत पात्र ठरले आहेत.दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयाचे धनश्री बाबुराव देवकते, शौर्या ज्ञानेश्वर राऊत, सिद्धी संदीप थेटे, रितेश राजेश्वर उबाळे, सोहम संतोष कुरूंद, ईश्वर गोविंद पाष्टे, यशराज सुदर्शन सोळंके, रुद्राक्ष विजय कळगंद्रे, यशवंत प्रल्हाद कराड जि.प्रा.कन्या शाळेची गौरी ज्ञानेश्वर तांबे, जि.प.प्रा.शाळा शिंदेवाडीचा सुदर्शन महादू सातपुते,अभिनव पब्लिक स्कूल चा ऋषिकेश वसुदेव काळे हे १२ विद्यार्थी सहावी इयत्तेसाठी पात्र ठरले आहेत. खोलेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष दिलीपराव पारेकर, जि.प.कें.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, अभिनव पब्लिक स्कूलचे प्राचार्य अभिमान पारेकर सह शिक्षकांनी पात्र विद्यार्थ्यांना अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# अ.भा.समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या सल्लागार मंडळावर डॉ.सुरेश खुरसाळे यांची निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे यांची अ.भा.समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या केंद्रीय सल्लागार मंडळावर निवड झाली आहे.

दि.२२ व २३ मार्च रोजी धाराशिव जिल्ह्यातील आपलं घर नळदुर्ग येथे अखिल भारतीय. समाजवादी शिक्षण हक्क सभेचे अकरावे व्दैवार्षिक अधिवेशन नुकतेच संपन्न झाले. त्यात डॉ.सुरेश खुरसाळे यांची निवड करण्यात आली. डॉ.खुरसाळे यांनी नांदेडात उभारलेले



रयत आरोग्य मंडळ हे सामान्य रुग्णांसाठी सेवा देत आहे. या रुग्णालयात सर्व सामान्य रुग्णास परवडेल असे योग्य व माफक शुल्क आकारले जाते. उपचार झालेले हजारो रुग्ण समाधानकारक आणि उत्तमरीत्या जीवन जगत आहेत तत्पर सेवेसाठी रयत रुग्णालयाची सर्वदुर ख्याती पसरली असून महाराष्ट्र व त्या बाहेरील ग्रामीण भागातील हजारो गोरगरीब व सर्वसामान्य रुणांची सोय झाली आहे.

यावेळी डॉ. खुरसाळे म्हणाले की, संघटनेच्या वतीने भविष्यात होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमांसाठी आणि संघर्षासाठी सोबत राहून काम करणार असल्याचे सांगून निवडी बद्दल आभार मानले.

संघटनेच्या वतीने डॉ. सुरेश खुरसाळे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी हेमंत धानोरकर, राजकुमार साळवी, प्रा. शैलजा बरुरे, डॉ. नरेंद्र काळे,कमलाकर राऊत यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.डॉ.सुरेश खुरसाळे यांच्या निवडी बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जात पडताळणी समिती बीडचे अध्यक्षपद घेण्यास संजीव जाधव यांची टाळाटाळ

## अजय सरवदे यांची उपसचिव व प्रधानसाचिव यांचेकडे उपायुक्त यांच्यामार्फत तक्रार

बीड । प्रतिनिधी

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीडमध्ये अध्यक्ष पद गेल्या ३० दिवसापासून रिक्त आहे. या अगोदर श्री. हरपाळकर यांचेकडे अतिरिक्त पदभार होता तेव्हाही विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र वैधतासाठी अडचणी होत्या यासाठी शासनाने महसूल व वन विभाग शासन आदेश क्रमांक पदोन्नती २०२५ प्र.क्र.१०/ई - १ दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अप्पर जिल्हाधिकारी निवड श्रेणी संवर्गातील नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती व पदस्थापना देणे बाबतचा शासन निर्णय जाहीर झाला होता. या अनुषंगाने श्री. संजीव शंकर जाधव यांची अप्पर जिल्हाधिकारी निवड श्रेणी या पदावर अध्यक्ष जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड या ठिकाणी पदस्थापना देण्यात आली होती तसेच शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ अन्वये पदोन्नत अधिकाऱ्यांना या आदेशान्वये सध्याच्या पदावरून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आले आहे. परिच्छेद क्रमांक ६ अन्वये सदर आदेश हेच कार्यमुक्ततेचे आदेश असून संबंधित विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी व अन्य संस्था प्राधिकरणे यांनी नव्याने आदेश काढण्याची आवश्यकता नाही. असे असताना पदस्थापना दिलेले श्री. संजीव शंकर जाधव अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड यांनी आदेश मिळाल्यापासून महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ मधील नियम ६३ मधील तरतुदीनुसार पदोन्नत अधिकारी ३० दिवसाच्या आत रुजू न झाल्यास सदरचे अधिकारी महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९६९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषय कारवाईस पात्र राहतील. असे स्पष्ट नमूद असताना संजीव शंकर जाधव ही जातीय मानसिकतेतून हा पदभार घेण्यासाठी टाळाटाळ करत असल्याची चर्चा आहे.

> **जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड मध्ये कामाची खूप मोठ्या प्रमाणात पेंडेन्सी वाढलेली आहे तसेच गरजू विद्यार्थी - विद्यार्थिनी वारंवार कार्यालयामध्ये चक्कर मारून आमची फाईल पूर्ण झाली आहे का अशी विचारणा करत आहेत परंतु अध्यक्ष संजीव शंकर जाधव यांनी पदभार न घेतल्याने असंख्य विद्यार्थी लांबचा प्रवास करून येतात त्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. शासन निर्णयाचे उल्लंघन करत ३० दिवसांमध्ये रुजू न झाल्याने. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी उपसचिव महाराष्ट्र शासन व प्रधान सचिव सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे केली आहे.**
>
> **-अजय सरवदे**
>
> **जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)**

पान ६ वरून...

### ५६ ग्रामपंचायत सरपंचाची

प्रवर्ग महिला व्हरकटवाडी, मैंदवाडी, भोगलवाडी ,तांदळवाडी ,संगम ,अमला -निमला ,फकीर जवळा ,सुकळी शेवटी सर्वसाधारण पहाडी दहिफळ, चारदरी, कोथिंबीर वाडी, असरडोह, अंजनडोह ,चोरंबा, गांजपूर, हिंगणी ,जहागीर मोहा ,कारी, मोरफळी, मुंगी, पांगरी, रुई धारूर, सोनीमोहा, सर्वसाधारण महिला तेलगाव ,भोपा, आरणवाडी ,आसोला, गावंदरा ,घागरवाडा, कन्नापूर ,कासारी ,खोडस, कुंडी, , आवरगाव, वाघोली, पहाडी पारगाव ,देवदहिफळ, चाटगाव अशी ५६ ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण सोडत संपन्न झाली. तालुक्यातील ग्रामस्थांसमोर लहान मुलाच्या हाताने चिठ्ठी काढून सरपंच आरक्षण प्रक्रिया पार पाडली यावेळी धारूर तहसीलचे तहसीलदार श्रीकांत निळे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, नायब तहसीलदार निवडणूक अधिकारी ढाकणे सह तालुक्यातील मतदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण सोडत पार पडताच भावी सरपंच कामाला लागत नमस्कार चमत्कार करून मीच दावेदार असल्याचे ग्रामस्थांना सांगताना तहसील परिसरामध्ये पाहायला मिळाले.

### बीड शहराला बारा

खर्चाने टँकरने पाणी आणावे लागते किंवा वेळ पडली तर डोक्यावर पाणी आणावे लागते. श्रीमंत लोकांचे ठीक आहे पण गोरगरीब लोकांना हा भुरदंड परवडणारा नाही. या प्रकाराला शेळ्यातील नागरिक त्रस्त झाले असून या प्रश्नावर आंदोलन करण्याचा इशारा संपूर्ण भारत क्रांती पार्टी चे प्रदेशाध्यक्ष अशोक थोरात यांनी दिला आहे. ते या प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणार आहेत. यावरही पाणी प्रश्न सुटला नाही तर संपूर्ण भारत क्रांती पार्टीच्या वतीने पाणी प्रश्नावरील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा अशोक थोरात यांनी दिला आहे.

### रुई पिंपळा गावचा

शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावात मागील १ वर्षात एक क्लास वन ऑफिसर, दोन क्लास टू ऑफिसर आणि शिवराजची अगदी वयाच्या १८ व्या वर्षी लष्करामध्ये निवड झाली आहे. गेल्या वर्षभरात जवळपास ४ आधिकारी म्हणुन गावातून निवड झाली. गावातील पुडील तरुण पिडी व शिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थ्यांनी पाहीलेले स्वप्न पुर्ण करण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळावी. यासाठी आम्ही ग्राम पंचातच्या वतीने गावच्या भुमी पुत्रांचा त्यांच्या आई वडीलांसह सत्कार करत आसतोत.मयुर आंधळे (सरपंच रुई पिंपळा)

### तालमार्तंड प्रकाश बोरगावकर

संपूर्ण महाराष्ट्रात कौतुकास्पद ठरलेला मोकाट जनावरासाठी राबविलेला एक घास तुमचा हा स्तुत्य उपक्रम अत्यंत नियोजनबध्द पद्धतीने राबवून मोकाट जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न त्यांनी दुर्गानगर वासियांच्या मदतीने सोडवला होता. ७१ वे रक्तदान संपन्न झाल्या बद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# अध्यक्षपदी गोविंद टाकणखार

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर माजलगाव येथे भीम जयंती साजरी करण्यासाठी दि २४ मार्च रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते दयानंद स्वामी होते.या बैठकीत सर्वानुमते जयंती समितीच्या पदाधीकाऱ्यांच्या एकमताने निवडी जाहिर करण्यात आल्या असून अध्यक्षपदी गोविंद टाकणखार,उपाध्यक्षपदी संतोष टाकणखार,कोषाध्यक्ष निशिकांत टाकणखार, जयपाल भिसे, सचिव बाळकृष्ण शिनगारे,चिंतामणी भिसे,मिरवणूक प्रमुख विक्की साळवे, बजरंग शिंदे,गौतम जावळे,विजय साळवे,आकाश टाकणखार, राजाभाऊ टाकणखार,प्रकाश तोडके,राजपाल टाकणखार,दीपक टाकणखार, नामदेव शिंदे, किशोर टाकणखर, वशिष्ठ टाकणखार, बंटी स्वामी,बबलू टाकणखार,संजोग कसबे,शीलवंत जावळे,सुमित साळवे,परमेश्वर शिनगारे,हिरामण जावळे,करण



टाकणखार, आबासाहेब भिसे, प्रेम भिसे,सौरव अविनाश लोखंडे, कांबळे दगडू,भिसे विश्वजीत,भिसे सुनील,भिसे अमिताभ,आलझेंडे आशिष,आलझेंडे हनुमान,भिसे संजय,भिसे युवराज,भिसे तुकाराम,चंद्रमणी भिसे, अविनाश आवचार,अनिल लोखंडे,गोटू भिसे यांची निवड करण्यात आली आहे. या प्रसंगी यूवा नेते अभय होके पाटील ,तालेब चाऊस,रोहन घाडगे ईश्वर होके, नारायणराव होके, भारतराव होके,दत्ता महाजन, शुभम डाके, मोहसीन बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी ,मुख्य कार्यकारी अधिकारी,शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते नवोदय पात्र विद्यार्थ्यांचा हासेगावमध्ये सत्कार

कळंब । प्रतिनिधी

१८ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पात्र परीक्षा मध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार ,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चे प्राचार्य दयानंद जटनुरे, शिक्षणाधिकारी (प्रा) अशोक पाटील, उपविभागीय अधिकारी संजय पाटील, गटविकास अधिकारी रावसाहेब चकोर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मा. बाळकृष्ण तांबारे , गट शिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते,विस्तार अधिकारी सुशील फुलारी, प्रभारी उपशिक्षणाधिकारी संतोष माळी, विस्तार अधिकारी जंगम साहेब, शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर जगदाळे यांच्या हस्ते कु. वैष्णवी प्रदिप यादव, अक्षरा वैभव तोडकर, श्रेया पांडुरंग धुमाळ व समर्थ अशोक तोडकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र



राज्य प्राथमिक शिक्षक संघ धाराशिव च्या वतीने जिल्हाभर राबवत असलेल्या ''गुढी पाडवा प्रवेश वाढवा'' आहे अभियान अंतर्गत पहिलीच्या विद्यार्थांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. दि. ५ मार्च २०२५ महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने निर्णयातील तरतुदी प्रमाणे पहिली व दुसरी विद्यार्थ्यांचे चावडी वाचन घेण्यात आले. शासन निर्णयात अपेक्षित क्षमता प्राप्त शाळा असल्याने प्रगत शाळा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हसेगांव के स्वयंघोषित करण्यात आले. याप्रसंगी शाळेत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या भोजन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले की सर्व सोयींनी युक्त अशी हसेगावची शाळा आहे . यामुळे शाळेचा सर्वांगीण विकास झाला आहे. जिल्ह्याच्या या टीमने शाळेच्या परिसराची पाहणी केली या वेळी परसबाग , विद्यार्थांच्या जेवणाची व्यवस्था,क्रीडांगण इ.सर्व भौतिक सुविधांची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले. शाळेत राबवत असलेल्या उपक्रमाची माहिती प्रशांत घुटे यांनी दिली . नवोदय पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे राजाभाऊ गुंजाळ, प्रशांत घुटे,श्रीमती लक्ष्मी कोकाटे शिवराज मेनकुदळे, विकास खारके, श्रीमती उषा चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.तर गुणवत्तापूर्ण वर्ग म्हणून श्रीमती प्रतिभा बिडवे, श्रीमती ज्योती ढेपे, श्रीमती सविता मेटे,श्रीमती विद्या मनगिरे यांचाही भाऊसाहेब यादव यांनी सत्कार केला.कार्यक्रम प्रसंगी स्काऊट गाईड पथकाने केलेले संचलन व लेझीम पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रशांत घुटे तर आभार राजाभाऊ गुंजाळ यांनी केले. या कार्यक्रमास ग्रामसेवक विजय लांडगे, तलाठी सोनवणे, मंडळ अधिकारी , रमेश शिंदे सर गावातील नागरिक शाम मंडळ , लालासाहेब यादव ,अशोक तोडकर ,वैभव तोडकर,श्रीकांत धुमाळ ,प्रदिप यादव,ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


cmyk

# १० हजार रुपयांचा एक आंबा

## नांदेडच्या युपीएससी करणाऱ्या तरुणने फुलवली अंब्याची बाग

युपीएससी करणाऱ्या नांदेडच्या एका तरुणाची सध्या राज्यभरात मोठी चर्चा आहे. जगातील सर्वात महागडा हा तरुण विकतोय. एका आंब्याची किंमत तब्बल १० हजार रुपये एवढी आहे. दोन वर्षांपूर्वी घेतलेल्या मियाझाकी आंब्याच्या लागवडीचा निर्णय आता या तरुणाला रसाळ फळे देत आहे. केवळ १० रोपांमधून आता या झाडांना ११-१२ फळे आली आहेत. नंदकिशोर गायकवाड असं या तरुणाचं नाव आहे. युपीएससीच्या अभ्यासासाठी पुण्यात गेलेल्या नंदकिशोरला कोरोना लॉकडाऊनमध्ये घरी परतावं लागलं. सहज ऑनलाईन सर्च करताना या आंब्याची ओळख झाली आणि त्यांनं दोन वर्षांपूर्वी फिलिपिन्समधून १०रोपं आयात केली. आता या हंगामात या झाडांना रसाळ फळे आली आहेत. विशेष म्हणजे एका आंब्याची किंमत १० हजार रुपये असल्यामुळे गावात चांगलंच कुतूहल निर्माण झालंय.

नांदेडच्या भोशी गावातील सुमनबाई गायकवाड यांचं शेत सध्या मोठ्या चर्चेचा विषय बनले आहे. जगातील सर्वात महागड्या आंब्यांची रोपं असणारं शेत म्हणून गावकरी त्यांच्याकडे बघत आहेत. तर या सगळ्याची सुरुवात झाली कृषी प्रदर्शनापासून. १७ मार्च रोजी सुमनताई जिल्ह्यातील कृषी व धान्य महोत्सवात त्यांची खास विणलेली टोपली घेऊन आल्या आणि चमकदार लाल रंगाच्या





आंब्यानं साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं. खास चव. अनोखा रंग असलेल्या विदेशी मियाझाकी आंब्याची ही टोपली होती. सुमनताईंचा मुलगा नंदकिशोरच्या कल्पनेतून सुमनताईंनी त्यांच्या शेतात जगप्रसिद्ध मियाझाकी आंब्यांची लागवड करण्याचा निर्णय घेतला.मराठवाड्यातील लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांप्रमाणे नंदकिशोरही नांदेडहून पुण्यात स्थलांतरीत झालेला. पण लॉकडाऊन लागलं आणि त्याला त्याचं कोचिंग क्लासला जाणं थांबवावं लागलं. त्यामुळे त्यांनं घरी परतण्याचा निर्णय घेतला. ऑनलाईन सर्च करत त्यानं त्याचा अभ्यास सुरु ठेवला. एके दिवशी सहज सर्च करत असताना मियाझाकी आंब्याविषयी त्याला माहिती मिळाली. जगातल्या सर्वात महागड्या आणि आलिशान मियाझाकी आंब्याच्या लागवडीची सगळी माहिती त्यानं वाचली. आणि उत्सुकता चाळवली. मग सुरु झालं संशोधन. हा आंबा कुठे पिकतो?आपल्याकडे कोणी लागवड करतं का? या आंब्याची व्यवहार्यता कितपत असेल? सगळी माहिती मिळवली आणि आईसोबत म्हणजेच सुमनताईंना हाताशी घेत फिलिपिन्सवरून ६५०० रुपये खर्चून १० रोपे आयात केली. टाईम्स ऑफ इंडियाच्या वृतानुसार, या झाडांना आता ११-१२ आंबे लगडले आहेत. कापणीसाठी, योग्य बाजारभाव कसा मिळेल यासाठी परभणीच्या एका अग्रणी शेतकऱ्याचे त्याने मार्गदर्शन घेतले. त्यामुळे सुमनताईंचे प्रीमियम फळ बाजारात मजबूत कमाई करणारे ठरले आहे. नंदकिशोरच्या प्रयत्नांना यश आल्याने गावात हे फळ लावण्यासाठी अनेक शेतकरी आशेनं पाहू लागलेत.

### मियाझाकी आंब्याचे वैशिष्ट्य काय?

लालसर केशरी रंगाचे दिसणारे मियाझाकी आंबे हे जगातील सर्वात महागडे आंबे म्हणून ओळखले जातात. मियाझाकी आंबा नावाचा हे रत्न जपानमध्ये उगम पावलंय आणि आता जगभरात लोकप्रिय झालंय.पण मियाझाकी आंब्याचं खरं वेगळेपण त्याच्या चव आणि पौष्टिकतेत आहे.यामध्ये बीटा-कॅरोटीन आणि फॉलिक ॲसिड मोठ्या प्रमाणात असतं, जे आपल्या त्वचेसाठी आणि पेशींना नुकसान होऊ न देण्यासाठी चांगलं असतं. व्हिटॅमिन सी आणि ए इतकं जास्त की, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, डोळ्यांची दृष्टी सुधारते आणि पचनही बिघडू देत नाही.

# वनस्पतींचे पाने पिवळे पडल्यास केवडा रोगाच्या लागणाची लक्षणे

वनस्पतींची पाने, शिरा व शिरांमधील भाग पिवळा, हिरवट पिवळा अगर केवड्यासारखा पिवळा आढळल्यास त्यांवर केवडा रोग पडला असे म्हणतात. हा रोग कवकजन्य (बुरशीसारख्या हरितद्रव्यरहित सूक्ष्म वनस्पतीमुळे होणारा), व्हायरसजन्य (अतिसूक्ष्म जीवांमुळे होणारा) वा अजीवोपजीवी (दुसऱ्या जीवावर उपजीविका करणाऱ्या जीवांव्यतिरिक्त इतर) कारणांमुळे होतो.

कवकजन्य केवडा रोगामध्ये (डाउनी मिल्ड्यू) पानांच्या वरील बाजूवर पिवळसरपणा आणि त्या जागी खालील बाजूंवर कवकाची किंचित फिकट राखी व फिकट जांभळी लवयुक्त वाढ आढळते. त्यामुळे तो भुरी रोगासारखा भासतो. केवडा रोगामध्ये कवकाची वाढ पानांच्या खालील बाजूवर असते, तर भुरी रोगामध्ये ती पानांच्या दोन्ही बाजूंवर आढळते. कवकाच्या वाढीत बीजाणू (लाक्षणिक प्रजोत्पादक अंग) व बीजाणुधर (बीजाणुधारक भाग) आढळतात. कवक पानाच्या आतील भागातच वाढते. दूषित पानावरील रंग पिवळा अथवा तपकिरी असतो. या रोगामुळे पाने सुकतात आणि निर्जीव बनतात. हा रोग विशेषतः पावसाळ्यात प्रकर्षाने आढळतो. हवेत अथवा मृदेत (जमिनीत) भरपूर आर्द्रता असल्यास या रोगाचा फैलाव त्वरित होतो. शैवल कवक (फायकोमायसीटीज) उपवर्गाच्या पेरोनोस्पोरॅलीझ या गणातील कवकांमुळे हा रोग होतो. प्रमुख पिकांवरील कवकांची नावे पुढील प्रमाणे आहेत.ज्वारी स्क्लेरोस्पोरा सोरघाय; बाजरी, राळा स्क्ले. ग्रॅमिनीकोला; मका स्क्ले फिलिपीनेन्सिस; नाचणी स्क्ले. मॅक्रोस्पोरा; ऊस स्क्ले. सॅकराय; द्राक्ष प्लॅस्मोपॅरा व्हिटीकोला; काकडी स्युडोपेरोनोस्पोरा क्युबेन्सिस; कांदा पेरोनोस्पोरा डिस्ट्रक्टर; चुका पे. रूमिसीस; कोबी पे. ब्रासिकी; सालीट ब्रिमीया लॅक्टसी. या रोगामुळे पाने सामान्यतः पिवळी पडत असली, तरी काही वेळा रोगामुळे ज्वारी व राळा या पिकांची पाने फाटतात व तंतुमय बनतात. बाजरीची व नाचणीची पाने विटकरी रंगाची दिसतात. बाजरी, राळा व क्वचित ज्वारी यांची कणसे हिरव्या कळ्या फुटल्यासारखी आणि दाणेरहित आढळतात. द्राक्षाची पाने तांबूस बनतात.मोहोर व देठ कवकाच्या प्रादुर्भावाने जळतात व फळे सुरकुततात. तृणधान्याच्या रोगट पानात कवकाचे संयुक्त बीजाणू (फलन झालेल्या स्त्री-जनन पेशींपासून तयार झालेले बीजाणू) आढळतात. पाने फाटल्याने ते मृदेत पडतात अथवा मळणीच्या वेळी बियांना चिकटतात. त्यामुळे बीजलेपन म्हणून वापरलेल्या एक टक्का पारायुक्त कवकनाशकाचा अत्यल्प उपयोग होतो. म्हणून तृणधान्याचे रोगप्रतिकारक वाण लावतात. द्राक्षे, कांदा आणि काकडीच्या केवडा रोगासाठी झायनेब किंवा ताम्रयुक्त कवकनाशके वापरतात. व्हायरसजन्य केवडा रोगात पाने संपूर्णपणे अथवा बहुतांशी फिकी वा पूर्ण पिवळी पडतात. घेवडा वर्गातील वनस्पतींवर असे रोग आढळतात. भेंडीवरील केवड्यात फक्त शिरा पिवळ्या व क्वचित इतर भाग पिवळा दिसतो. पपई, टोमॅटो, बटाटा, तंबाखू इ. पिकांच्या पानांवर गर्द व फिकट हिरवा रंग आढळतो. प्रकाशात रोगग्रस्त पाने धरल्यास रंगमिश्रिती व विभिन्नता स्पष्ट दिसते. व्हायरसजन्य केवडा रोग पांढरी माशी, मावा, तुडतुडे या कीटकांमुळे फैलावतो. या रोगावर उपाय म्हणजे रोगट वनस्पती उपटून नष्ट करतात, शेतातील तण काढून स्वच्छता ठेवतात व निरोगी वनस्पतींवर कीटकांमार्फत रोग पसरू नये याकरिता कीटकनाशके फवारतात. अजीवोपजीवी कारणांपैकी काही मूलद्रव्यांच्या उणिवेमुळे केवडा रोग होतो. मोसंबीवर जस्ताच्या आणि उसावर लोहाच्या उणिवेमुळे हा रोग आढळतो. याकरिता कोणते मूलद्रव्य कमी पडले आहे हे शोधून उपाययोजना करतात. पिकांना नायट्रोजन कमी पडल्यानेही पाने पिवळी पडतात. पाणी जरूरीपेक्षा जास्त वा कमी देण्यानेही अशीच लक्षणे आढळतात.

सारांश, केवडा रोग कशामुळे झाला आहे हे शोधून त्यानुसार उपाययोजना केल्यास या रोगाचे निवारण होऊ शकते.

# टोमॅटोच्या भरघोस उत्पादनासाठी उपाययोजना



टोमॅटोचे भरघोस उत्पादन मिळवण्यासाठी खालील उपाय केल्यास तुम्हाला भरपूर उत्पादन मिळेल.

योग्य जात निवडा : टोमॅटोचे भरपूर उत्पादनासाठी टोमॅटोच्या योग्य वाणाची निवड करणे गरजेचे असते. तुमच्या हवामानाशी जुळत्या टोमॅटोच्या जातीची निवड करावी. जर तुम्ही हिवाळ्यात टोमॅटोची लागवड करत असाल तर वेगळ्या वाणाची निवड करावी. तसेच, उन्हाळ्यात टोमॅटोच्या लागवडीसाठी योग्य जातीची निवड करावी.

टोमॅटो लागवडीपूर्वी जमिनीची मशागत : टोमॅटोचे भरपूर उत्पादनासाठी टोमॅटो लागवडी पूर्वी जमिनीचे माती परीक्षण करून पहावे. त्यामुळे सुपीक जमीन बनवण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याचे आकलन करता येईल. तसेच टोमॅटो लागवडीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन आवश्यक असते. जमिनीचा सामू तपासून घेतल्याने आवश्यक त्या उपाययोजना करून जमिनीचा पत वाढवण्याचा प्रयत्न करता येईल. टोमॅटोच्या लागवडीसाठी सुपीक जमीन असेल तर उत्पादन देखील भरपूर प्रमाणात होईल.

टोमॅटोची लागवड पद्धत : टोमॅटो लागवड करताना झाडाच्या मुळांना प्रोत्साहन देण्यासाठी पानांचे पहिल्या सेटपर्यंत जमिनीत खोलीवर लागवड करावी. त्यामुळे झाडाचे मूळ खोलवर जातील. झाडाची वाढ होत असताना झाडाला काठीने किंवा इतर गोष्टीने आधार द्यावा व झाडाचा जमिनीशी असलेला संपर्क कमी करावा. यामुळे टोमॅटोचे फळ जमिनीच्या संपर्कात येणार नाही व त्यापासून होणाऱ्या रोगाचा धोका कमी होईल. आणि त्यातून टोमॅटोचे भरपूर उत्पादन मिळेल.

पाणी व्यवस्थापन : टोमॅटोला नियमित पाणी देण्याची गरज असते. त्यासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. अन्यथा जास्त पाणी दिले गेले किंवा झाडाच्या पानाखाली पाणी गेल्याने मुळे कुजणे किंवा फळे फुटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे योग्य पाणी व्यवस्थापन करणे टोमॅटोच्या भरपूर उत्पादनासाठी गरजेचे असते.

खत व्यवस्थापन : टोमॅटोच्या पिकाला संतुलित खत देणे गरजेचे असते. त्यासाठी फॉस्फरस पोटॅशियम आणि नायट्रोजन ने समृद्ध असलेले संतुलित खत वापरावे. नायट्रोजन पानांच्या वाढीत प्रोत्साहन देते, तर फॉस्फरस आणि पोटॅशियम फळांच्या वाढीसाठी महत्त्वाचे असते.

खत आणि बियाणे : उत्पादकांच्या सूचनांचे पालन खत व्यवस्थापन करताना करावे. योग्य खत व्यवस्थापनाने टोमॅटोचे उत्पादन भरपूर प्रमाणात मिळवता येऊ शकते.झाडांची छाटणी : छाटणीमुळे झाडाची ऊर्जा फळांच्या उत्पादनाकडे नेण्यास मदत होते. त्यासाठी झाडाचे मुख्य खोड व फांद्यांमध्ये दिसणाऱ्या लहान कोंबांची खालची पाने काढून टाकावी. त्यामुळे हवेचा प्रवाह वाढतो, झाडावर रोग कमी पडतात, आणि मोठ्या आकाराची टोमॅटो झाडाला लागण्यासाठी ऊर्जा केंद्रित होते. टोमॅटोच्या झाडांच्या छाटणीचा भरपूर उत्पादन मिळण्यासाठी फायदा होतो.

कीड व रोग व्यवस्थापन : कीड व रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर करावा. तसेच माती पासून पसरणारे रोग टाळण्यासाठी पिके फिरवा. तसेच रोगाचा प्रादुर्भाव थांबवण्यासाठी रोगग्रस्त झाडे ताबडतोब काढून टाका.

टोमॅटोच्या पिकावर ॲसिडस सारख्या सामान्य किटकांवर लक्ष ठेवा. याचा प्रादुर्भाव झाल्यास उत्पादनात घट होते. योग्य वेळी कीड व रोग व्यवस्थापन केल्यास टोमॅटोचे भरपूर उत्पादन मिळण्यास फायदा होतो. टोमॅटोची योग्य वेळी काढणी करा : जास्तीत जास्त उत्पादन आणि चव येण्यासाठी टोमॅटोची काढणी कधी करावी हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जेव्हा टोमॅटो पूर्णपणे रंगीत असतात आणि टनक असतात तेव्हा टोमॅटोची काढणी करण्याची योग्य वेळ असते. टोमॅटोची कापणी करताना खोडापासून काढण्यासाठी फळाला हळुवारपणे मिळावे किंवा कात्रीने छाटणी करावी. निष्कर्ष : टोमॅटोच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी वरील दिलेल्या टिप्सचा वापर करा. व टोमॅटोच्या पिकाची काळजी घ्या. वरील दहा टिप्स चा वापर करून तुम्ही चांगल्या दर्जाच्या टोमॅटोच्या उच्च उत्पादनाची अपेक्षा करू शकता. योग्य वाण निवडण्यापासून माती परीक्षण करण्यापासून ते छाटणी आणि काढणी करेपर्यंत प्रत्येक टप्पा तुमच्या टोमॅटोचे उत्पादन वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५५२: गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू बनले.
१६६८: इंग्रजांनी इस्ट इंडिया कंपनीच्या मध्यमातून मुंबई प्रांतावर आपले अधिकार प्राप्त केले होते.
१७८०: ब्रिटीश वर्तमानपत्र ब्रीट गैजेट आणि संडे मॉनीटर यांचे प्रकाशण सर्वप्रथम रविवारच्या दिवशी करण्यात आले.
१९०२: नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे केंद्रीय कायदेमंडळात अर्थसंकल्पावर इंग्रजीमध्ये अतिशय सुंदर असे पहिले भाषण झाले.
१९१०: लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी औंध संस्थानातील कुंडच्या माळावर कारखाना तसेच वसाहत उभारण्याच्या कामाला प्रारंभ केला. पुढे या परिसराला किर्लोस्करवाडी असे नाव रूढ झाले.
१९४२: इंदिरा नेहरू व फिरोझ गांधी यांचा विवाह.
१९४२: ऑस्विच येथील छळछावणीत पहिले महिला कैदी दाखल झाले.
१९७२: पहिली आंतरराष्ट्रीय संस्कृत परिषद संपन्न झाली.
१९७४: गढवालमधील हेनवलघाटी येथे गौरा देवी यांच्या नेतृत्त्वाखाली चिपको आंदोलनाची सुरूवात.
१९७९: अन्वर सादात, मेनाकेम बेगिन आणि जिमी कार्टर यांनी वॉशिंग्टन (डी. सी.) येथे इस्त्रायल-इजिप्त शांतता करारावर सह्या केल्या.
२०००: ब्लादिमिर पुतिन यांची रशियाच्या अध्यक्षपदी निवड झाली.
२०१३: त्रिपूरा उच्च न्यायालयाची स्थापना.
१९७१: बांगलादेश चा स्वातंत्र्य दिन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७४: अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांचा जन्म.
१८७५: दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सिंगमन र्ही यांचा जन्म.
१८७९: स्विस-अमेरिकन सिव्हिल इंजिनियर ओथमार हमेन अम्मान यांचा जन्मदिन. त्यांनी डिझाईन केलेल्या ब्रिज डिझाईन्समध्ये जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिज, वेर्राझानो-नारोज ब्रिज आणि बायोन ब्रिज यांचा समावेश आहे.
१८९८: जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी पुमा व ॲडिडासचे संस्थापक रुडॉल्फ ''रुडी'' डसलर यांचा जन्मदिन.
१९०७: हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ महादेवी वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९८७)
१९०९: साहित्यिक, संशोधक, दैनिक गोमंतक चे पहिले संपादक बाळकृष्ण दत्तात्रेय तथा बा. द. सातोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर २०००)
१९१९: भारतीय राजकारणी, महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि दिग्गज काँग्रेसचे नेते तासेच विधानसभेचे माजी सभासद व माजी कॅबिनेट मंत्री भिकाजीराव जिजाबा खताल- पाटील यांचा जन्मदिन.
१९२९: शीख धार्मिक नेत्यांच्या संत मतवादी वंशाचे आध्यात्मिक शिक्षक ठाकर सिंह यांचा जन्मदिन.
१९३३: हिंदी साहित्य व संस्कृतीचे लेखक आणि अभ्यासक कुबेर नाथ रे यांचा जन्मदिन.
१९६९: विक्रम राठोड, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९७३: गुगल चे सह-संस्थापक लॅरी पेज यांचा जन्म.
१९७३: लंडन स्टॉक एक्सचेंज ने २०० वर्ष जुने ऐतिहासिक नियम मोडीत काढत महिलांना पहिल्यांदाच नोकरीवर रुजू करून घेतले.
१९८५: झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू प्रॉस्पर उत्सेया यांचा जन्म.
१९८७: भारतीय फुटबॉल खेळाडू रॉविल्सन रॉड्रिग्ज यांचा जन्मदिन.
१९९८: पुमा से कंपनी चे निर्माते रुडॉल्फ दास्स्लेर यांचा जन्म. (मृत्यू: १९७४)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२७: कर्णबधिर संगीतकार लुडविग व्हान बीथोव्हेन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७०)
१८२५: वेस्टर्न युनियन चे सहसंस्थापक अंसन स्तागेर यांचे निधन. (जन्म: २० एप्रिल १८२५)
१९३८: लक्ष्मीनाथ बेझबरुआ, ज्येष्ठ असमिया साहित्यिक.
१९९६: के. के. हेब्बर, भारतीय चित्रकार.१९९७: नवकमल फिरोदिया, ज्येष्ठ गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती.
१९९८: डॉ. शांतिनाथ देसाई -कन्नड साहित्यिक.
१९९९: आनंद शंकर - संगीतकार.
२००१: जनार्दन हरी पटवर्धन - स्वातंत्र्यसैनिक आणि सनदी अधिकारी.
२००३: डॅनियेल पॅट्रिक मॉयनिहॅन - अमेरिकन सेनेटर, भारतातील अमेरिकेचे राजदूत आणि अमेरिकेच्या सिनेटमध्ये भारताची बाजू मांडणारा नेता.
२००३: हरेन पंड्या - गुजरातचे माजी मंत्री (हत्या).
२००३: देविदास सडेकर - मराठी पत्रकार.
२००६: भारतीय राजकारणी व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पश्चिम बंगाल राज्य समितीचे सचिव अनिल विश्वास यांचे निधन.
२००८: महाराष्ट्रीयन मराठी लेखक व दलित साहित्यिक बाबुराव बागूल यांचे निधन.
२०१२: प्रसिद्ध पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचे निधन. (जन्म: १० मे १९४०).

# परोपजीवी कीटक करतील पिकांवरील हानिकारक किडींचे नियंत्रण!

सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त जैविक कीड नियंत्रण ही काळाची गरज झालेली आहे. रासायनिक कीटकनाशकाचा अनियंत्रित वापरामुळे हानिकारक किडीमध्ये प्रतिकार क्षमता निर्माण होत आहे, तसेच या रासायनिक कीटकनाशकामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत परोपजीवी मित्र कीटकांची ओळख आणि संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. परोपजीवी हे मित्रकीटक नुकसानकारक किडींपेक्षा आकाराने लहान असतात. ते किडीच्या अंगावर किंवा शरीरामध्ये राहतात. किंवा किडींच्या शरीरामध्ये, शरीरावर अंडी घालून तिला हळूहळू खातात. आजच्या लेखात जाणून घेऊ या जैविक कीड नियंत्रणासाठी वेगवेगळे परोपजीवी कीटक आणि त्यांची उपयुक्तता.

परोपजीवी कीटकांचे प्रकार :

ट्रायकोग्रामा -या परोपजीवी कीटकाचा उपयोग ऊस, भात, मका, ज्वारीवरील खोडकिडी, कांडी कीड, कपाशी वरील बोंडअळी, भाजीपाला पिकांवरील शेंडा व फळे पोखरणारी अळी, घाटे अळी, डाळिंबावरील सुरसा, कोबीतील चौकोनी ठिपक्याचा पतंग इ. किडींच्या नियंत्रणासाठी होतो. एका ट्रायकोग्रामा कार्डवर सुमारे २० हजार परोपजीवीयुक्त अंडी असतात. अशा ट्रायकोकार्ड्सचे २ ते ४ प्रति एकर प्रमाणात तर प्रौढांचे २०,००० प्रौढ/एकर याप्रमाणे प्रसारण करावे. किडीच्या प्रादुर्भावानुसार आठवड्याच्या अंतराने ४ ते ५ प्रसारणे करावीत.

चीलोनस -या परोपजीवी कीटकाचा उपयोग बटाट्यावरील पाकोळी, कपाशीवरील बोंडअळी व इतर पतंगवर्गीय किडींच्या नियंत्रणासाठी होतो. २४,००० ममीज/एकर याप्रमाणे प्रसारण करावे. गरजेनुसार ३ ते ४ प्रसारणे करावीत.

एनकार्शिया -हे परोपजीवी कीटक बहुतांश भाजीपाला, फळझाडे, फुलझाडे, व पॉली-हाउसमधील पिकांवरील रसशोषक किडी (पांढरी माशी, मावा, उसावरील लोकरी मावा इ.) च्या नियंत्रणासाठी उपयुक्त आहे. नुकसानकारक किडींचा प्रादुर्भाव दिसू लागताच या किटकांचे प्रसारण करावे.

एपिरिकॅनिया -हे मित्र कीटक उसावरील नुकसान कारक पायरीला या किडीच्या पिल्ले व प्रौढ अवस्थांवर उपजीविका करतात. या कीटकांमुळे पायरीलाचे अत्यंत प्रभावी नियंत्रण होते. २०,००० अंडी किंवा २००० कोष/एकर. गरजेनुसार पुढील प्रसारणे करावीत.

अपेंटालीस /कोटेशिया - भाजीपाला पिकांतील शेंडा व फळे पोखरणारी अळी, उसावरील खोडकीड, कांडी कीड, बोंडअळी, घाटेअळी इ. च्या नियंत्रणासाठी या कीटकाचा उपयोग होतो. २०,००० प्रौढ/एकर

ब्रेकॉन -कापसावरील बोंडअळी, बटाट्यावरील पाकोळी, भेंडीवरील शेंडा व फळे पोखरणारी अळी, भात, मका व उसावरील खोडकीड, नारळावरील काळ्या डोक्याची अळी व इतर पतंगवर्गीय किडींच्या नियंत्रणासाठी या कीटकाचा उपयोग होतो. २०,००० प्रौढ/एकर

कोपिडोसोमा -हे परोपजीवी बटाट्यावरील पाकोळीच्या जैविक नियंत्रणासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. २००० अळ्या/एकर

एनासियस -हे परोपजीवी कीटक असून मोठ्या प्रमाणावर उपद्रव करणाऱ्या पिठ्या ढेकूण (मिली बग) या किडीच्या नैसर्गिक नियंत्रणात मुख्य कार्य करतात.





## थोडक्यात



### ओम काळेची भारतीय नौदलात अग्नीवीर म्हणून निवड

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या बीसीए द्वितीय वर्षातील विद्यार्थी ओम बाजीराव काळे या विद्यार्थ्याची नुकतीच भारतीय नौदलात अग्नीवीर (एसएसआर) म्हणून निवड झाली आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण महाविद्यालय परिसर आनंदित झाला आहे. त्याच्या निवडीबद्दल देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी ओम या विद्यार्थ्याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि त्याच्या भविष्यातील करिअरसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांनीही विद्यार्थ्याच्या कठोर परिश्रमाचा गौरव करून त्याला अभिनंदन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही ओम काळे यांचे अभिनंदन करून त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभकामना दिल्या. संस्थेने देशसेवेसाठी तयार होत असलेल्या या तरुणाच्या समर्पणावर अभिमान व्यक्त केला आहे.

### ॲड.उज्ज्वल निकम यांची ऑलिव रेस्टॉरंट आणि,फिटनेस येथे भेट

बीड । प्रतिनिधी

बहुचर्चित खटल्यांमध्ये महत्त्वाची कामगिरी करत तसेच दहशतवादी अजमल कसाब विरुद्ध खटल्यात सरकारी वकील



म्हणून महत्वाची कामगिरी बजावणारे प्रसिद्ध विधीज्ञ ॲड.उज्ज्वल निकम यांनी येथील नगर नाका परिसरात असलेल्या ऑलिव रेस्टॉरंट आणि रिजेन फिटनेस येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांच्या समवेत येथील प्रसिद्ध वकील ॲड.बाळासाहेब कोल्हे यांची उपस्थिती होती. यावेळी दोन्ही जेष्ठ विधीज्ञ यांचा सत्कार इंजिनीयर राजेंद्र भोपळे, इंजिनीयर प्रतीक भोपळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ऑलिव रेस्टॉरंटचे मॅनेजर संजय धुरंधरे, रिजेन फिटनेसचे मॅनेजर पंकज तावरे यांच्या समवेत मित्र परिवार आणि येथील कर्मचारी उपस्थित होते.

### माँ कर्मा देवी यांची जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.अरुण भस्मे



यांच्या मार्गदर्शनाखाली माँ कर्मा देवी यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर, डॉ.राजू घुगे, डॉ.विवेक दुसाने, डॉ.नासेर शेख, डॉ.अनिस अहेमद, सौं. संध्या गौशाल, एकनाथ टेपाळे, तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य महेंद्र गोशाल यावेळी बोलतांना म्हणाले की, प्रत्येक संत हे जनकल्याणासाठी कार्य करत असतात त्याच प्रकारे माँ कर्मा देवी यांनी देखील कार्य केले आहे. म्हणून शेकडो वर्षानंतर देखील आपण त्यांची जयंती साजरी करत आहोत. माँ कर्मा देवी या भगवान जगन्नाथच्या भक्त होत्या असे देखील त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश थोरात यांनी केले.


### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा.श्री. ओ.एन.मंत्री ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), बीड ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ५२३/२०२५**

**पार्वतीबाई बळीराम क्षीरसागर व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार १. पार्वतीबाई भ्र. बळीराम क्षीरसागर, वय ७३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. बऱ्हाणपूर, ता.जि. बीड, २. शिवदास पि. बळीराम क्षीरसागर, वय ५७ वर्षे, धंदा नौकरी, रा. बऱ्हाणपूर, पो. म्हाळसजवळा, ता.जि. बीड, ३. आशालता भ्र. रामनाथ जाधव, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. साळींबा, पो. पिंपरखेड, ता. वडवणी, जि. बीड ज्याआर्थी मयत नामे बळीराम पि. धनाजी क्षीरसागर, हे दिनांक १६/०६/२०२४ रोजी मयत झाले आणि वरील अर्जदार पार्वतीबाई भ्र. बळीराम क्षीरसागर, रा. बऱ्हाणपूर, ता. जि. बीड.

| अ.क्र. | बँकेचे नाव | खाते क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडीया शाखा आनंदवाडी, बीड | बचत खाते क्र. ०७६११०११००१६३४५ | ५,४१३/- |
| २ | बँक ऑफ महाराष्ट्रा शाखा छत्रपती संकुल, बीड | ६०१३६१३०१९८ | ३८,३८९/- |

व त्यावरील आजपर्यंतचे व्याज, व मयतांच्या नावे असणा-या व मिळणाऱ्या इतर शासकिय व निमशासकीय योजनांचा फायदा मिळण्यासाठी इंडीयन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. अर्जदार हा मयताचे वारस या नात्याने मागणी करीत आहेत.

त्यापेक्षा सदर अर्जदार सदर मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदर मयत बळीराम पि धनाजी क्षीरसागर, रा. बऱ्हाणपूर, ता. जि.बीड चे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

**आज दिनांक २६/०३/२०२५ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले. पुढील तारीख २९/०४/२०२५.**

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# युवकांनी उद्योजकतेला प्राधान्य द्यावे - डॉ.दिक्षित

## अध्यापकांनी ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे करावे –डॉ. सुधाकर गुट्टे

पाटोदा । प्रतिनिधी

आपल्या विद्यापीठाला ज्या महान विभूतींचे नाव दिलेले आहे अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राप्त केलेल्या कित्येक पदव्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन युवकांनी अनेक पदव्या प्राप्त करून ज्ञान संपादन करावे तसेच नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अभिप्रेत असल्याप्रमाणे पदवीधारक युवकांनी नोकरी मिळवण्याऐवजी नोकरी देणारे व्हावे यासाठी युवकांनी उद्योजकतेला प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराचे संचालक डॉ. प्रशांत दिक्षित यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २६ मार्च रोजी आयोजित पदवी प्रमाणपत्र प्रदान सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. विशेष निमंत्रित अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य संदीप जाधव, दुसरे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर,



उपप्राचार्य डॉ. सतिश माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. सुधाकर गुट्टे म्हणाले की, युवकांनी प्राप्त केलेली पदवी हे त्यांच्या पालकांच्या, शिक्षकांच्या व स्वतःच्या श्रमाचे फलित असून भविष्यातही विद्यार्थ्यांनी अधिकाधिक ज्ञान प्राप्त करावे तसेच अध्यापकांनी अविरतपणे ज्ञानदान करत रहावे. याप्रसंगी संदीप जाधव यांनीही पदवीधारकांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर देशातील कोणतेही उच्च पद भूषविण्यासाठी पात्र झाला आहे म्हणून युवकांनी प्राप्त केलेल्या पदवीचे मूल्य जाणून घ्यावे. कार्यक्रमात प्रारंभी विद्यापीठगीत गायन करण्यात आले. तद्नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संस्थेच्या संस्थापिका कै. केशरबाई क्षीरसागर यांच्या प्रतिमांचे पूजन, पुष्पमाल्यार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. मुख्य कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने करण्यात आली.

प्रास्ताविक परीक्षा समिती अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले. यानंतर प्राचार्य आबासाहेब हांगे यांचा करिअर कट्टा उपक्रमात उत्कृष्ट प्राचार्य म्हणून जिल्हास्तरावर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तसेच डॉ. गणेश पाचकोरे, डॉ. मनोजकुमार प्रकाश, प्रा. अजिंक्य साखरे, डॉ. पद्माकर ससाणे, प्रा. कावेरी खुरणे, डॉ. शकुंतला बडे यांचा विविध पुरस्कार व उपलब्धी प्राप्त केल्याबद्दल अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. शरद पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. मनिषा गाढवे, प्रा. विमल अलापुरे, डॉ. कल्याण घोडके, डॉ. लक्ष्मण गाडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास सर्व विद्याशाखांचे पदवीधर विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

# विश्वस्त कार्यशाळेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड आणि जिल्हा धर्मादाय वकील संघ बीडच्या संयुक्त विद्यमाने सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड येथे शुक्रवारी विश्वस्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित राहणार असुन अध्यक्षस्थानी धर्मादाय उपायुक्त बीड प्रदिप चौधरी हे असणार आहेत.

महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील विश्वस्तांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून विश्वस्तांसाठी कायद्याचे ज्ञान तसेच न्यास व संस्थेचे कार्य आणि व्यवस्थापन कायद्यानुसार होण्यासाठी तसेच न्यासाचे कार्य व विश्वस्तांचे उत्तरदायित्वाची माहिती, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची माहिती देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे शुक्रवार दि.२८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ या वेळेत सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड येथे आयोजन करण्यात आले आहे. उपस्थित विश्वस्तांना कार्यशाळेद्वारे संस्थेच्या व न्यासाच्या पदाधिकार्यांसह अमुल्य मार्गदर्शन देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजेश ससाणे हे राहणार असुन ते बहुमूल्य प्रमुख मार्गदर्शन आपल्या जिल्ह्याच्या विश्वस्तांना या कार्यशाळेत करणार आहेत.

तरी या विश्वस्त कार्यशाळेत जिल्ह्यातील संस्था व न्यास यांच्या पदाधिकार्यांसह विश्वस्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन ॲड.उदयसिंह सालपे, सुधीर कांबळे, राम औटे, बाप्पुसाहेब जाधव, गोविंद कासट, सुग्रीव सपकाळ यांच्यासह सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड, जिल्हा धर्मादाय वकील संघ बीडच्या पदाधिकार्यांनी केले आहे.

# संदीप पवार यांना लोकमत महाराष्ट्रीयन पुरस्कार प्रदान

पिंपळवंडी । प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जरेवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड येथील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री.संदीप पवार यांना लोकमत समुहातर्फे दिला जाणारा लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर २०२५ हा पुरस्कार नुकताच राजभवन मुंबई येथे राज्यपाल मा.सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे,लोकमत वृत्त समूहाचे श्री.राजेंद्रजी दर्डा यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते.





लोकमत तर्फे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर हा पुरस्कार दिला जातो.यावर्षी शिक्षक वर्गातून जरेवाडी शाळेचे सहशिक्षक श्री.संदीप पवार यांना मानांकन मिळाले होते.त्यानुसार राज्यभरात वोटिंग करण्यात आले.वोटिंग मधील गुणांकन तसेच संबंधित शिक्षकांनी केलेले लेखनीय कार्य याची दखल घेत निवड समितीने शिक्षक वर्गातून महाराष्ट्रातून संदीप पवार यांची निवड केली आणि मुंबई येथील राजभवनात एका शानदार समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला.याबद्दल जिल्ह्यातील पत्रकार बांधव,अधिकारी वर्ग, परिसरातील सर्व नागरिक यांच्याकडून श्री.संदीप पवार यांचे अभिनंदन होत आहे.

# मराठा आणि कुणबी विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरावर वसतीगृह सुरु करा

## आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनात सरकारने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मराठा आणि कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. सारथीकडून या बाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली मात्र उच्च शिक्षण विभाग आणि नियोजन विभागातील विसंवादामुळे छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतीगृह स्थापन करण्यास विलंब होत असून शासनाने या बाबत सुधारीत शासन निर्णय करून मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर वसतीगृह सुरु करावेत अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली आहे.



गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.विजयसिंह पंडित यांनी मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतीगृह सुरु करण्याची मागणी विधानसभेत केली. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांचेकडून जिल्हास्तरावर वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र प्रत्यक्षात जिल्ह्याच्या ठिकाणी अद्याप मराठा विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा मिळत नाही. सारथीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी या बाबत सविस्तर पत्र लिहून शासन निर्णयात सुधारणा करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. परंतु त्याची दखल प्रशासकीय पातळीवर घेतली नसल्यामुळे याप्रकरणी विलंब होत आहे. हाच मुद्दा आ.विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत उपस्थित केला.


या बाबत बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, शासनाच्या विविध योजनेत ज्या विभागाकडून वसतीगृहे चालविली जातात त्याच विभागाकडून लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर निर्वाह भत्त्यासह इतर निधी जमा केला जातो. आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग यांसह इतर विभागांमध्ये ही पध्दत अवलंबविली जाते मात्र सारथीकडून चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून दिला जावा अशी तरतुद शासन निर्णयात केली आहे. वसतीगृह चालविणारा विभाग आणि निर्वाह भत्ता अदा करणारा विभाग वेगवेगळा असल्यामुळे प्रशासकीय दृष्टीने ही बाब गैरसोयीची ठरत आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवून दिलेले शुल्क विद्यार्थ्यांनी वसतीगृह चालविणाऱ्या संस्थेला देण्याची तरतुद असली तरी ही रक्कम विद्यार्थी संस्था चालकांना देतील याची हमी संस्था चालकांना वाटत नसल्यामुळे वसतीगृह सुरु करण्यास अडचण येत आहे.पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, दि.०९.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयात दुरुस्ती करून सारथीकडून चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहासाठी संस्था चालक आणि विद्यार्थी यांना द्यावयाच्या अनुदान व इतर निधी देण्यासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सारथीच्या संचालक मंडळातील सदस्यांनी अनेक जिल्हाधिकाऱ्यांशी या बाबत चर्चा करून तसा अहवाल शासनाला सादर केला आहे.

या मधील त्रुटी दूर करून शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि नियोजन विभाग यांच्यातील विसंवाद दूर करून मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतीगृहाची सुविधा विनाविलंब सुरु करावी अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली आहे.याप्रकरणी आ.विजयसिंह पंडित हे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची भेट घेवून त्यांना या बाबतचे निवेदन देणार आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान यु टर्न नाही

**न्यायालय, जिल्हाधिकारी, तहसिलला जाण्यासाठी पाऊण किलोमीटरचा हेलपाटा**

**जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष्य घालावे : डॉ.गणेश ढवळे**



बीड । प्रतिनिधीफ

बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटर रस्त्याचे नियोजन शुन्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. याठिकाणी खडी,धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होतो. नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. मनमानी कारभारामुळे व रखडलेल्या कामामुळे अपघाताला निमंत्रण मिळत असून सर्वसामान्यांचे हाल होत आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेत या कामाची पाहणी केल्यानंतर महामार्ग प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांना पत्र देऊन कंत्राट दाराची मनमानी थांबविण्याचे सुचवत सदर काम कोणत्याही परिस्थितीत एक आठवड्याच्या पूर्ण करण्याचे तसेच कंत्राटदारास एक कोटीचा अतिरिक्त दंड करण्याचे निर्देश दिले आहेत.या रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगर नाका दरम्यान यापूर्वी सहा जागेवर यू टर्न घेण्यासाठी जागा सोडण्यात आली होती. सध्या मात्र एकही यु टर्न नाही. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून न्यायालय, तहसील, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाण्यासाठी नागरिकांना आता नगर नाक्याचा पाऊण किलोमीटरचा हेलपाटा मारावा लागणार आहे. दुसरीकडे या रस्त्याच्या उत्तर बाजूला मुलींचे वस्तीगृह ,जुनी जिल्हा परिषद (ज्यामध्ये आजही अनेक कार्य सुरू आहेत) न्यायालय ,तहसिल, मुख्य प्रशासकीय इमारत, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तर दक्षिण बाजूला शासकीय प्रशिक्षण आरोग्य केंद्र, जिल्हा कारागृह, शासकीय विश्रामगृह, चंपावती क्रिडामंडळ ,पंचायत समिती आदी कार्यालये आहेत. त्यामुळे भविष्यात या कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांच्या अडचणी व संभाव्य अपघात लक्षात घेता पूर्वीप्रमाणेच यु टर्न दुभाजकांमध्ये ठेवण्यात यावेत. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर व शेख युनुस च-हाटकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

# परळीतील पाणी प्रश्न गंभीर; ॲड.मनोज संकाये यांनी मुख्याधिकाऱ्यासमोर मांडली कैफियत

## एक दिवसाआड पाणीपुरवठा करा; नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यास दिले निवेदन!

परळी । प्रतिनिधी

परळी शहरास पाणीपुरवठा करणारे नागापूर येथील वाण धरण यावर्षी अत्यंत समाधानकारक पाऊस झाल्याने भरले. याच धरणातून परळी शहरात पाणीपुरवठा होतो. मात्र नगरपालिकेचे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक ऐन उन्हाळ्यात कोलमडल्याने सध्या आठ दिवसाला पाणीपुरवठा होतो. हा पाणीपुरवठा दिवसाआड करावा या मागणीसाठी अँड. मनोज संकाये यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. त्रिंबक कांबळे यांना मित्र मंडळाच्या वतीने निवेदन सादर केले असून त्यांनी शहरातील पाणीपुरवठा बाबत मुख्याधिकाऱ्यासमोर कैफियत मांडली. याप्रकरणी मी स्वतः दोन ते तीन दिवसांमध्ये योग्य ती कार्यवाही करून प्रश्न निकाली काढण्यात येईल असे आश्वासन



नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी शिष्टमंडळास दिले.

सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की,सध्या नागापूर येथील वाण धरणात दोन वर्षे पुरेल एवढा पाणीसाठा आहे परंतु धरण उशाला आणि कोरड घशाला या म्हणी प्रमाणे शहरातील नागरिकांची बेहाल होत आहे. अनेक नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करत आहे. वेळापत्रकानुसार नगरपालिका पाणीपुरवठा करत नाही त्यामुळे अनेक महिलांना पाणी सुटण्याची वाट पहावी लागते त्यामुळे त्यांचा रोजगार बुडतो तरीसुद्धा पाणी काही येत नाही अशी परिस्थिती शहरातील अनेक भागांमध्ये निर्माण झाली आहे.हालगे गल्ली, मोंढा मार्केट, विद्यानगर, शारदानगर ,पंचशील नगर माणिक नगर, न्यू माणिक नगर बजरंग नगर, शिवाजीनगर ,समता नगर, आयोध्या नगर येथील नागरिक पाण्याची अक्षरशः देवाप्रमाणे वाट पाहत आहेत परंतु पाणी काही दिवसात येत नाही सध्या पाणी आठ दिवसाला येते मात्र ते कधी येईल याचा नेम नाही. त्यामुळे अनेक महिला ज्या नोकरी करतात आणि रोजगार करतात त्यांचा रोजगार बुडत आहे परिणामी नागरिकांच्या आर्थिक नुकसान होत आहे. पाणीही अत्यंत गरजेचे बाब आहे. परंतु नगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिक आहेत. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना याबाबतची त्यांनी माहिती दिली तसेच याबाबत योग्य ती कारवाई दोन ते तीन दिवसात करून दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन नगरपालिकेकडून देण्यात आले. यानंतर जर दिवसाआड पाणीपुरवठा शहरास झाला नाही तर नगरपालिकेसमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.यावेळी काशिनाथ सरवदे, अनिल चौधरी, संदीप चौधरी, प्रवीण रोडे ,वैजनाथ केंद्रे, आनंद कातकडे, संतोष कांबळे ,राजू कांदे, राम गडदे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.


# महिला व बालकल्याण कार्यालय वाऱ्यावर

## मुख्य कार्यकारी अधिकारी कारवाई करणार का?

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्याचे महिला व बालकल्याण कार्यालय वाऱ्यावर असल्याचे दिसून आले या कार्यालयात एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले असून हे कार्यालय वाऱ्यावर असल्याचे चित्र पाहावयास मिळाले.**

वडवणी तालुक्यामध्ये जवळपास ११३ अंगणवाडी शाळा असून या अंगणवाडी अंतर्गत लहान मुलांचे पोषण आहारासह सर्वच शासनाच्या विविध योजना राबवल्या जातात तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस प्रशासनाच्या योजनेसह लहान मुलांची योग्य ती काळजी घेतात का ? यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक पर्यवेक्षिका चार महिला सुपरवायझर एक विस्तारअधिकारी एक क्लार्क एक शिपाई कामकाज पाहण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेले आहेत प्रत्यक्षात मात्र



हे कर्मचारी ऑफिसला न येता उंटावरूनच शेळ्या हाकत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याशी समन्वय ठेवून सर्व तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी चांगल्या प्रकारे काम करण्यासाठी योग्य त्या सूचना देत प्रशासनाच्या विविध योजना राबवून लहान बालके सक्षम करण्याचे काम महिला व बालकल्याण कार्यालयाच्या मार्फत करणे गरजेचे असताना प्रत्यक्षात मात्र वडवणी येथील महिला व बालकल्याण कार्यालय हे नुसते नावालाच आहे का काय असाच प्रश्न तालुक्यातील नागरिकांना पडला आहे. या ठिकाणी नियुक्त असलेले काही कर्मचारी बीडऊन येणं जाणं करत असल्यामुळे या कार्यालयात कर्तव्य बजावण्यासाठी वेळेवर येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.. आशा काम चुकार कर्मचाऱ्यास प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील नागरिकांमधून होत आहे.

काही दिवसापूर्वीच खळवाट लिमगाव येथील अंगणवाडी शाळा सुट्टी नसतानाही बंद ठेवण्याचा प्रकार उघडकीस आला होता त्या गावातील ग्रामपंचायत सदस्य मोरे यांनी अंगणवाडी शाळा बंद का ठेवली असा जॉब विचारीत बंद अंगणवाडीचा व्हिडिओ फेसबुकला व्हायरल केला होता यावरून असे चित्र दिसून येते की वडवणी तालुक्यातील महिला व बालप्रकल्प कार्यालय येथे नियुक्त असलेल्या सुपरवायझर व कर्मचारी काय काम करतात हेच कळायला तयार नाही. प्रशासनाने अशा कामचुकार कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील नागरिकांतून होत आहे..

# उन्हाची तीव्रता वाढली; नागरिक हैराण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

काही दिवसांपासून शहराच्या तापमानात अचानक वाढ झाली असून पारा मोठ्या अंकावर पोहचला आहे. अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हापासून बचाव करण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असून दुपारी तर बाजारपेठेत शुकशुकाट दिसत आहे वाढत्या उन्हाचा फटका मानवासोबतच पशुपक्षी आणि बन्यजीवांनाही बसत आहे.



मध्यंतरीच्या आणि ढगाळी वातावरणामुळे उन्हाची तीव्रता जाणवली नाही. मार्च महिन्याच्या शेवटीच सुर्य आग ओकत असल्याचे दिसत आहे. उन्हाची

तीव्रता चांगलीच वाढली आहे. काही वेळा थंड हवा वाहत आहे. सकाळी ९वाजल्यानंतर वातावरण हळूहळू बदलून तापमान वाढत जाते. यापासून संरक्षण व्हावे म्हणून नागरिक टोप्या, छत्री, रुमाल याचा वापर करताना दिसून येत आहेत वाढत्या उन्हाचा परिणाम जलस्त्रोतावरही होत आहे. नदी. ओढे कोरडे पडले असून विहिरीतील पाणी पातळीही झपाट्याने कमी होत असून लहान मोठी डबकी आटत चालल्याने पशुपक्षी आहे. आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासोबतच बुट्टेनाथ दरी,आद्यकवी मुकूंदराज समाधी परिसर, रेणुकादेवी मंदीर या डोंगर दऱ्यातील पशुपक्षी व वन्यजीवांचीही पाण्यासाठी भटकंती सुरु झाली आहे वनविभागाने पानवठे निर्माण करण्याची गरज आहे आगामी काही दिवसात तापामानात वाढ होण्याची शक्यता आहे. वाढत चाललेल्या उन्हामुळे थंडपेयाची मागणी वाढली आहे.

-दिवसभर उन राहत असल्याने दुपारी बाजारपेठेत शुकशुकाट दिसत अद्याप उष्माघाताचे रुग्ण आढळून आले नसले तरी शासकीय रुग्णालयाने नागरिकांनी जास्तीत जास्त पाणी प्यावे व सावलीचा आधार घ्यावा. काम असल्यासच घराबाहेर पडावे अशा अनेक सूचना दिल्या आहेत.

# अनुसूचित जाती निवासी आश्रम शाळा शिक्षक कर्मचाऱ्यांचा उपोषणाचा दुसरा दिवस

बीड। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय बीड च्या समोर शाहू-फुले-आंबेडकर निवासी आश्रम शाळा महाराष्ट्र राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपोषणास बसले आहेत. उपोषणाचा आज दुसरा दिवस असून उपोषणकर्ते हैराण झाले आहेत. उपोषण स्थळी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख यांनी भेट दिली तसेच बीड येथे ॲड. उज्ज्वल निकम साहेब आले असता त्यांना निवेदन देण्यासाठी या आश्रम शाळेचे शिष्टमंडळ भेटले व निवेदन दिले त्यांनीही मुख्यमंत्र्यांशी भेटुन आपला प्रश्न मार्गी लावतो असा शब्द दिला. परंतु बीड जिल्ह्यातील संविधानीक पदावर असणारे लोकप्रतिनिधी किंवा संबंधित खात्याचे अधिकारी हे




कोणीही उपोषण स्थळी फिरकले नाहीत. उपोषणकर्ते व सहकारी शिक्षक दुसऱ्या दिवशीही शेकडोच्या संख्येत उपस्थित होते. गेल्या १८ वर्षांपासून विनावेतन काम करणारे शिक्षक हतबल झाले आहेत. तसेच १५ मार्च या दिवशी धनंजय नागरगोजे सर यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्यामुळे सर्व शिक्षक त्या दुःखातून सावरले नाहीत प्रत्येक कर्मचाऱ्याला वाटते आपले काय होणार? की आपल्याला धनंजय नागरगोजे सर सारखी आत्महत्या करुन मरावे लागणार या हतबलतेमधुन शिक्षक सावरला नाही म्हणून आमरण उपोषणाचा मार्ग शिक्षकांनी निवडला आहे तरी मुख्यमंत्री, अर्थमंत्री व सामाजिक न्यायमंत्री यांना विनंती आहे की हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा नाही तर आणखी दुसरा धनंजय नागरगोजे तयार होऊ नये अशा भावना उपोषण कर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# बीड शहराला बारा ते पंधरा दिवसाला एकदा पाणीपुरवठा

## पाणी प्रश्नासाठी अशोक थोरात लाक्षणिक उपोषण करणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील पाणी प्रश्न पाणी असूनही गंभीर असून बीड शहरातील नागरिकांना बारा ते पंधरा दिवसाला एकदा पाणी मिळते. आता उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची आवश्यकता असतानाही आणि पाणी उपलब्ध असतानाही केवळ यंत्रणामुळे पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नसल्याने या प्रश्नावर संपूर्ण भारत क्रांती पार्टी चे प्रदेशाध्यक्ष अशोक थोरात यांनी लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

बीड शहरामध्ये दोन ठिकाणाहून पाणीपुरवठा होतो. बिंदू सरा प्रकल्प आणि माजलगाव धरणातून बीड शहराला पाणीपुरवठा होतो. मात्र



बीड शहरातील पाणीपुरवठा करणारी यंत्रणा सक्षम नसल्याने आणि नगरपालिकेच्या भोंगळ कारभारामुळे बीड शहरातील नागरिकांना तब्बल १२ ते १५ दिवसाला एकदा पाणी मिळते. आता उन्हाळ्याचे दिवस आहेत .त्यामुळे पाण्याची आवश्यकता अधिक आहे तरीही पाणीपुरवठा होत नाही. आता लोकांना स्वतःच्या ◀◀ पान ३ वर

# सादोळा येथे ग्राम दरबार उपक्रम

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सादोळा येथे महाराष्ट्र शासन जिल्हा परिषद बीड अंतर्गत ग्रामपंचायत सादोळा व पंचायत समिती केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवस गावकऱ्यां सोबत (ग्राम दरबार उपक्रम ) संपन्न झाला.

यावेळी केज तालुक्याचे सहाय्यक गटविकास अधिकारी श्री राठोड साहेब प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे सरपंच श्री अंगदराव इंगळे तर प्रमुख अतिथी म्हणून उतपल्ले साहेब कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती केज, उपसरपंच कमलाकर राऊत,चौरे विस्तार अधिकारी केज,राठोड विस्तार अधिकारी पंचायत समिती,हजारे पशुसंवर्धन विभाग,डोईफोडे मॅडम वैद्यकीय अधिकारी तांबवा उपकेंद्र,श्रीमती कांबळे मॅडम () पाणीपुरवठा विभाग



पंचायत समिती केज,ग्राम विस्तार अधिकारी राऊत,नवनाथ जाडकर,थळकरी मॅडम,रुद्रे सर प्रा.आ.केंद्र युसुफवडगाव,आशा कार्यकर्ती इंगळे मॅडम,अंगणवाडी ताई राऊत मॅडम,तर ग्रामस्थ म्हणून सतीष शिंदे,दिनकर राऊत, सुर्यकांत शिंदे,गणेश इंगळे, मेघराज इंगळे, सुरेश राऊत ,शुभम राऊत, श्री पद्माकर राऊत, बापू इंगळे,लक्ष्मण शिंदे,जयसिंग राऊत,पृथ्वीराज इंगळे,श्रीराम मस्के यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील खेडी ही स्वयंपूर्ण स्वयंशासित असावीत अशी धारण आहे .या अनुषंगाने विविध विकास योजना अंतर्गत विविध उपक्रम, सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहोचणे हेच सुप्रशासनाचे लक्षणे आहेत.याच मुद्द्यावर गाव स्तरावर विविध भागातील वरिष्ठ कार्यरतील अधिकारी व गावकरी यांच्यासोबत संवाद बैठक झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन श्री पद्माकर राऊत यांनी केले.

# ५६ ग्रामपंचायत सरपंचाची आरक्षण सोडत

## ग्रामपंचायतमध्ये कोणत्या प्रवर्गाचा सरपंच होणार ते ठरले,भावी सरपंच लागले कामाला

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील राज्यातील ग्रामविकास विभाग यांच्याकडून तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण सोडत २५ मार्च रोजी धारूर येथील तहसील कार्यालयाच्या तळमजल्यामध्ये तहसीलदार श्रीकांत निळे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, नायब तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी ढाकणे यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले.यावेळी ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धारूर तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या



प्रवर्गासाठी व महिलांसाठी पाच वर्षाकरिता २०२५ ते २०३० या दरम्यान गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता आरक्षित करून संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. धारूर तालुक्याचा आरक्षण तपशिल सरपंच पदे पुढील प्रमाणे आहेत यामध्ये अनुसूचित जाती-०९ पदे, अनुसूचित जमाती-०२ पदे, नागरिकांचा मागास प्रवर्ग-१५ पदे, खुला प्रवर्ग-३० पदे असे एकुण ५६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत २५ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता तहसील कार्यालयातील तळमजला येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले. यात अनुसूचित जाती साठी सरपंच पद

पिपरवाडा, मोहखेड, चिखली, शिगणवाडी यात महिला सरपंच थेटेगव्हाण, काटेवाडी उंमरेवाडी, कोळपिंपरी, हिंगणी, अनुसूचित जमाती सर्वसाधारण आंबेवडगाव, महिला सरपंच धुनकवड , नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण बोडका, चिंचपूर ,सुरनरवाडी, चोंडी, गोपाळपूर ,कोयाळ, देवठाणा, नागरिकांचा मागास ◀◀ पान ३ वर

# रुई पिंपळा गावचा शिवराज आंधळे झाला पहिला फौजी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा गावचे भुमिपुत्र शिवराज प्रभाकर आंधळे यांची नुकतीच भारतीय लस्करामध्ये निवड झाली. गावातील पहीलाच फौजी होण्याचा मान त्याला मिळाल्याने गावचा स्वाभिमान म्हणुन ग्रामपंचायत युवा सपंच मयुर आंधळे यांच्या पुढाकाराने गावात गावकऱ्यांच्या वतीने भुमीपुत्राचा यथोचित सत्कार करुन जंगी स्वागत करण्यात आले.

तालुक्यातील रुई पिंपळा हे गाव डोंगर पट्यातील पुनर वसीत गाव आहे. गावात सर्व समाज बांधव गुण्या गोविंदाने नांदतात. गावचे उच्च शिक्षीत गावचा कायापालट करणारे युवा सरपंच मयुर आंधळे यांच्या



ग्रामपंचायतने केले जंगी स्वागत!

संकल्पनेतुन आतापर्यंत गावातील जे शासकीय नोकरदार वर्ग आहे त्यांचा व त्यांच्या आई वडीलांसह गावात मोठ्या आदराने एथोचित सत्कर करुन सन्मान केला जातो. शिवराजने आपल्या जिद्द चिकाटी आणि मेहनतीने आपल्या आई वडीलांचे स्वप्न पुर्ण केले आहे. घरची परस्थिती जेमतेम आहे. वडील स्वतःची जिप चालऊन व शेतात काबाड कष्ट करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. रुई पिंपळा गावात विविध उच्च पदावर नोकरीला आहेत परंतु या गावात सैनिक एकही नव्हता हे विशेष तरी यावेळी शिवराज प्रभाकर आंधळे याने आपल्या आवड व इच्छाशक्ती नुसार गावातील पहिला फौजी होण्याचा मान मिळवलेला आहे. त्याचे देशसेवेसाठी असणारे प्रेम गावातील नवीन पिढीसाठी आदर्श व प्रेरणादायी ठरणार आहे. तसेच त्याच्या या यशामध्ये त्याच्या आई वडिलांचा सिहांचा वाटा आहे. आई वडिलांनी दिलेले सुस्कार व त्यांना सर्व समाजाप्रती असणारे प्रेम त्याच्या कामी आले आहे. त्यामुळे आई वडीलांचा ही सर्व ग्रामस्थांच्या उपस्तितीत गावकऱ्यांच्या शुभ हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील पहिला फौजी मान मिळवणारा शिवराज आंधळे यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीस ◀◀ पान ३ वर

# उद्या बीडमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक

## मोठ्या संख्येने उपस्थित राहावे; आयोजक समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासातून प्रेरणा घेऊन येणारी पिढी चारित्र्य संपन्न व सामर्थ्यशाली बनावी या हेतूने नवीन शैक्षणिक धोरणात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा या महत्वपूर्ण मागणी सोबतच मराठा समाजातील विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सरकार समोर मांडून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्या शुक्रवार (ता. २८) रोजी संध्याकाळी सहा वाजता बीड शहरातील आशीर्वाद मंगल कार्यालय येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्यातील शिक्षक, वकील,



डॉक्टर इंजिनिअर सर्व कर्मचारी व समाज बांधव संघटनेच्या भव्य बैठकीचे आयोजन केरण्यात आले आहे. मनोज दादा जरांगे यांच्या उपस्थितीत महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान या बैठकीत मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात हे पाहणं सुद्धा महत्त्वाचं ठरणार आहे. या बैठकीस मेळाव्याचे स्वरूप निर्माण होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील मराठा समाजाने या मेळाव्यास एक दिवस जातीसाठी या उद्धेशाने समाज बांधवानी मोठ्या प्रमाणात उपस्थितीत राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांचा रक्तदानात विक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संगीत आणि सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी गेल्या वीस वर्षांपासून आपण समाजाचे देणे लागतो ही भावना अंगीकारून रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान समजून रक्तदानाला सुरुवात केली आहे.स्वारातीमध्ये उपचार सुरु असलेल्या नागेश औताडे यांना अचानक रक्ताची गरज पडली .अंबाजोगाई शहरातील सोशल मिडीया ग्रुपवर रक्ताची गरज असल्याची पोस्ट केली होती. ती पोस्ट पाहून स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये तात्काळ जाऊन ७१ वे रक्तदान करून तालमार्तंड प्रकाश बोरगावकर



यांनी नवीन विक्रम स्थापित केला आहे. बनारस घराण्याचे तबला वादक म्हणून ख्याती असणाऱ्या ताल मार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी कोरोना सारख्या भयंकर परिस्थितीत सतत रुग्णांच्या मदती साठी सदैव पुढाकार घेत होते एवढेच नाही तर ◀◀ पान ३ वर

# धार्मिक सलोखा व शांतता राखा -पो.नि.वाघमोडे

## किल्लेधारूरमध्ये सण-उत्सवांसाठी शांतता समितीची बैठक

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

आगामी सण गुढीपाडवा, रामनवमी, हनुमान जयंती आणि रमजान महिन्यात शांतता राखण्यासाठी किल्लेधारूर पोलीस ठाण्यात मा. पोलिस अधिक्षक नवनित कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. तहसील कार्यालयाचे पुरवठा अधिकारी काकडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, पीआय भोर, पीआय सरजे यांच्यासह शांतता समितीचे सदस्य, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत पत्रकार सूर्यकांत जगताप, अनिल महाजन, सादेक



इनामदार आणि रामनवमीचे आयोजक भांगे यांनी आपल्या सूचना मांडल्या. पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी सविस्तर मार्गदर्शन करत शांतता राखण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच, कोणत्याही अडचणी आल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

पुरवठा अधिकारी काकडे यांनी अध्यक्षीय भाषण केले, यावेळी नगरसेवक राजू कुमार कोमटवार, पत्रकार शुभम शुक्ला,पोलीस कर्मचारी व मोठ्या संख्येने धारूर शहरातील युवक व शांतता समितीचे सदस्य, पत्रकार आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महापालिकेच्या १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना स्क्रॅप धोरण लागू; तब्बल ४७३ गाड्यांचा होणार लिलाव

पुणे । प्रतिनिधी

देशातील जुनी वाहने भंगारात काढण्यासाठी सरकारने नुकतेच नवीन 'वाहन स्क्रॅप धोरण' लागू झाले आहे. या धोरणानुसार १५ वर्षे पेक्षा जून्या गाड्यांची पूर्ननोंदणी आरटीओ कार्यालयाने नोंदणी बंद केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या मालकीच्या ४७३ गाड्यांचा लिलाव करण्याचा महापालिकेने निर्णय घेतला आहे. त्यानुसार आज (मंगळवार ) हा लिलाव होणार असून पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संस्थेने गाड्यांचा लिलाव केला जाणार आहे, अशी माहीती अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.



केंद्र सरकाच्या वाहन स्क्रॅप धोरणानुसार महापालिकेच्या १५ वर्षे पेक्षा जून्या गाड्यांची नोंदणी आरटीओने रद्द केल्या आहेत. हे धोरण लागू होण्यापूर्वी महापालिकेकडून २४ ते २५ वर्षापर्यंत गाड्या वापरात आणल्या जात होत्या. त्यामुळे वाहने रस्त्यात बंद पडणे, गाड्यांचा पार्ट तुटणे असे प्रकार घडत होते. नवीन गाड्या घेण्यासाठी केली जाणारी दिरंगाई यामुळे महापालिकेच्या मोटार वाहन विभागाला या गाड्या दुरुस्त करुन वापरण्याची वेळ येत होती. परंतु आता केंद्राच्या धोरणानुसार महापालिकेच्या विविध विभागातील एकूण ४७३ गाड्यांचा लिलाव महापालिकेच्या नेमलेल्या समितीने निर्णय घेतला आहे.जी वाहने केंद्र किंवा राज्य सरकारच्या चलनातून बाहेर काढली जातील किंवा जी अतिरिक्त आहेत किंवा दुरुस्त केली जाऊ शकत नाहीत, ती नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग फॅसिलिटीकडे स्क्रॅपिंगसाठी पाठवली जातील. या व्यतिरिक्त, कोणत्याही वाहनांचा लिलाव, जप्त किंवा हक्क नसलेली वाहने नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग फॅसिलिटीवर वाहनांना स्क्रॅप केले जाईल याचे नियम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार महापालिकेची ४७३ वाहनांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. अशी माहिती मोटार वाहन विभागाचे प्रमुख जयंत भोसेकर यांनी सांगितले.

स्क्रॅप झालेल्या वाहनांची किंमत महापालिकेच्या समितीने तसेच राज्य सरकारने नेमण्यात आलेल्या यंत्रणेकडून किंमत निश्चित करण्यात आली आहे. ही किंमत गोपनीय असल्यामुळे या गाड्यांची किंमत सध्या जाहीर करता येणार नाही, असे भोसेकर यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने ४ चे ५ एजन्सी नेमल्या आहेत. एजन्सींच्या माध्यमातून गाड्यांची खरेदी केली जाणार आहे. या एजन्सींकडून बोली लावण्यात येईल, समितीने आणि राज्य सरकारच्या यंत्रणेने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा जी किंमत अधिक मिळेल, त्या किंमतीला या गाड्यांची विक्री केली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# मावशीच्या घरात चोरी करणाऱ्या भाच्याला अवघ्या तीन तासांत पोलिसांकडून अटक; लाखोंचा ऐवज जप्त

पुणे । प्रतिनिधी

मावशीच्याच घरात चोरी करणाऱ्या भाच्याला पोलिसांनी अवघ्या तीन तासांत बेड्या ठोकल्या. त्याने सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. पोलिसांच्या तत्परतेमुळे चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. किरण राजेश कुंटे (वय २८, रा. धोबी घाट, कॅम्प) असे पकडलेल्या भाच्याचे नाव आहे. याप्रकरणी ४० वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. त्यावरून लष्कर पोलिसांनी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




वरिष्ठ निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर आणि निरीक्षक (गुन्हे) प्रदिप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक राहुल घाडगे, अंमलदार महेश कदम, सोमनाथ बनसोडे केली आहे. तक्रारदार या घरकाम करतात. त्या कॅम्प परिसरात राहण्यास आहेत. त्यांच्या मुलीच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी घराचा दरवाजा ओढून ठेवला होता. ही संधी साधत अज्ञाताने घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातून सोन्याचे दागिने ग रोख रक्कम चोरून नेली. चोरीची ही घटना उघडकीस आल्यानंतर त्यांनी लष्कर पोलिसांत तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून अज्ञातावर गुन्हा दाखल केला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना खबऱ्याकडून माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी किरण कुंटे याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तसेच तो, तक्रारदार यांचाच भाचा असल्याचे समोर आले होते. तो मावशीच्या (तक्रारदार) घरी पाणी पिण्याच्या बहाण्याने गेला होता. त्यावेळी त्याला मावशीचे घराचे दरवाजे उघडे असल्याचे दिसले. नंतर त्याने चोरीच्या उद्देशाने घरात प्रवेश केला आणि लोखंडी कपाटातील ड्रॉवरमधून सोन्याचे दागिने आणि १० हजार रुपये रोख चोरले. पोलिसांनी किरणकडून चोरीचा सर्व मुद्देमाल, म्हणजेच सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम, जप्त केली आहे. विशेष म्हणजे, ही कारवाई गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या तीन तासांत पूर्ण झाली.

# 'ड्रग्ज फ्री समाज व ड्रग्ज फ्री पुण्यासाठी 'या' तीन स्तरावर'; काय म्हणाले पोलिस आयुक्त अमितेश कुमार?

पुणे: 'ड्रग्ज फ्री समाज' व 'ड्रग्ज फ्री पुण्या'साठी पुणे पोलिसांचे प्राधान्य आहे. त्यादृष्टीने पोलिसांची कारवाई तीन स्तरावर सुरू असून, विक्रेते, पिणारे तसेच उत्पादन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली. पुणे पोलिसांनी गेल्या काही वर्षात कारवाईकरून ७५ गुन्ह्यात जप्त केलेले जवळपास ७ कोटी ७६ लाख रुपयांच्या ८०० किलो ग्रॅम ड्रग्ज रांजणगाव येथील कारखान्यात नष्ट करण्यात आले.





पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी यासंदर्भाने माहिती दिली. यावेळी सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, गुन्हे शाखेचे अप्पर आयुक्त शैलेश बलकवडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथक तसेच स्थानिक पोलिसांनी कारवाईकरून तस्करांकडून कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज पकडले. जवळपास ७५ गुन्ह्यातील हे ड्रग्ज नष्ट करण्याची न्यायालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर मंगळवारी ते नष्ट करण्यात आले. मेफेड्रोन, ब्राऊनशुगर, अफू, एलएसडी, गांजा असा ड्रग्जचा यात समावेश होता.

वर्षभरात ३६०० कोटींचे ड्रग्ज जप्त

गेल्या वर्षी पोलिसांनी ३६०० कोटींचे एमडी हा ड्रग्ज पकडले. तो नष्ट करण्याचीही अंतिम तयारी सुरू असून, येत्या दीड ते दोन महिन्यात नष्ट होईल, असेही यावेळी अमितेशकुमार यांनी सांगितले. या गुन्ह्यात प्रमुख आरोपी संदीप धुनिया हा नेपाळमार्गे परदेशात पळून गेला आहे. तो अद्याप तपास यंत्रणांच्या हाती लागला नाही. हा गुन्हा आता एनसीबीकडे तपासाला वर्ग केला असून, धुनियाचा परदेशात शोध घेतला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. पुणे ड्रग्ज मुक्त करण्यासाठी पोलिसांचे प्राधान्य असून, त्यादृष्टीने कारवाई सुरू असल्याचे ते म्हणाले.

# अनधिकृत होर्डिंग्जबाबत अधिकारी अनभिज्ञ! पुण्यात होर्डिंग व फ्लेक्सचा सुळसुळाट?

पुणे । प्रतिनिधी

शहरात सगळीकडे होर्डिंगचे व फ्लेक्सचा सुळसुळाट पाहायला मिळत असताना महापालिकेच्या आकाश चिन्ह व परवाना विभागाकडे शहरातील व समाविष्ट गावांमधील अनधिकृत होर्डिंगची माहितीच नाही. ज्यांनी रीतसर परवानगी घेतली आणि ज्या होर्डिंगवर कारवाई करण्यात आली, याचीच माहिती प्रशासनाकडे आहे. दरम्यान, शहरात २६३८ अधिकृत होर्डिंग असून, वर्षभरात २३६ अनधिकृत होर्डिंगवर कारवाई केल्याची माहिती आकाशचिन्ह व परवाना विभागाने दिली आहे. तसेच होर्डिंग व फ्लेक्सच्या परवान्यातून ३१ कोटी, तर कारवाईतून दोन कोटी उत्पन्न मिळाले आहे.



महापालिका हद्दीत कोठेही होर्डिंग किंवा फ्लेक्स उभे करण्यासाठी आकाश चिन्ह व परवाना विभागाकडून सशुल्क परवानगी दिली जाते. महापालिकेने परवानगी दिलेल्या होर्डिंगचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याची व दरवर्षी परवान्याचे नूतनीकरण करण्याची जबाबदारी संबंधित होर्डिंग मालकावर असते. परवानगी दिलेल्या कालावधीनंतर संबंधितांनी सदर जाहिरात काढली नाही, तर महापालिकेकडून त्याच्यावर कारवाई केली जाते.

मात्र, महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता शहरातील विविध रस्ते, चौक, पदपथ, इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे होर्डिंग आणि फ्लेक्स उभारले जातात. यामुळे महापालिकेचे उत्पन्न बुडते. अशा बेकायदेशीर जाहीरातबाजीवर महापालिकेकडून कारवाई केली जाते. मात्र अधिकारी, कर्मचारी आणि व्यावसायिकांचे असणारे लागेबांधे आणि त्याला मिळणारे राजकीय पाठबळ यामुळे कारवाईला लगाम लागतो. त्यामुळे शहरात अनधिकृत फ्लेक्सबाजी, जाहिरातबाजी आणि होर्डिंगचा आलेख दिवसेंदिवस वाढताच आहे. परिणामी शहराचे विद्रुपीकरण होते.

# दोन मुलींवर अत्याचार; पोलिसांकडून अल्पवयीनांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

शिवाजीनगर भागात किरकोळ वस्तूंची विक्री करुन उदरनिर्वाह करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोघांवर शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी दोन अल्पवयीन मुलांसह त्यांच्या आईवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित ४२ वर्षीय मुलींच्या आईने शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, शिवाजीनगर भागातील चौकात प्लास्टिक पिशवी, पेन, तसेच फुले विक्री करण्याचे काम मुली करतात. दोघी चुलत बहिणी आहेत. पीडित मुली आणि त्यांचे कुटुंबीय फिरस्ते असून, ते किरकोळ वस्तुंची विक्री करुन उदरनिर्वाह करतात. या पीडित मुलींच्या मोठ्या बहिणीचा विवाह आरोपी अल्पवयीन मुलांच्या नात्यातील एका तरुणाशी झाला आहे. त्यामुळे मुली आरोपींना ओळखतात. १७ मार्च रोजी अल्पवयीन मुले शिवाजीनगरमध्ये आले. त्यांनी मुलींना बहिणीची भेट घालून देतो, असे सांगून दुचाकीवरून नेले. त्यावेळी आरोपी मुलांची आई तेथे होती. मुलींवर दोघांनी बलात्कार केला. पीडित मुलीच्या आईने याबाबत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपास केला. तसेच, अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले.



## कसबा मतदार संघातील महिला आघाडी, पदाधिकारी करणार शिंदेसेनेत प्रवेश

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून पुणे, पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सोडसिठ्ठी देत शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश केला आहे. यामुळे उबाठा गटातील गळती सुरू असल्याचे चित्र आहे. आता पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंना पुण्यात मोठा धक्का बसला आहे.

कसबा मतदार संघातील महिला आघाडी तसेच पुण्यातील अनेक शाखा प्रमुख, शिवशैविक उद्धव यांची साथ सोडून शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश करणार आहेत. आज संध्याकाळी उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित हा प्रवेश मुंबईत पार पडणार आहे.

पुण्यात उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. कसबा विधानसभा मतदारसंघातील महिला आघाडी तसेच पुण्यातील अनेक शाखा प्रमुख आणि शिवसैनिक तसेच शिवसेनेचे उपशहर प्रमुख बाळासाहेब मालुसरे शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश करणार आहेत. आज संध्याकाळी मुंबईत बाळासाहेब भवन येथे हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडणार आहे. निलम गोऱ्हे यांच्या पुढाकाराने कसबा विधानसभा मतदारसंघातील महिला आघाडीतील पदाधिकारी आपल्या हाती धनुष्यबाण घेणार आहेत.

आज प्रवेश करणारी महिला आघाडी कसबा मतदारसंघ उबाठा

आश्विनी मल्हारे, प्रतीक्षा महाले, भक्ती जगदाळे, सुप्रिया खेडकर, समीरा प्रधान, दिपाली पोटे, नूतन शरद दिवार, वैजयंती फाटे

# सायबर चोरट्यांकडून तरुणांची फसवणूक; गुंतवणुकीच्या आमिषाने लाखांचा घातला गंडा

पुणे । प्रतिनिधी

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणुकीचे सत्र कायम असून, सायबर चोरट्यांनी दोन घटनांत दोघांची ४५ लाख रुपयांची फसवणूक केली. खराडी भागातील तरुणाची ३६ लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत ३२ वर्षीय तरुणाने खराडी पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारदार तरुणाच्या मोबाइलवर सायबर चोरट्यांनी संपर्क साधून शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले. चोरट्यांनी तरुणाला एका ग्रुपमध्ये ॲड केले. तिथे गुंतवणूकीची माहिती दिली. तरुणाचा विश्वास संपादन केल्यानंतर त्याला ३६ लाख ५५ हजार रुपये भरण्यास भाग पाडले. वरिष्ठ निरीक्षक संजय चव्हाण तपास करत आहेत.



हडपसर भागातील तरुणाचीही अशाच प्रकारे ८ लाख ४१ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत तरुणाने वानवडी पोलिसांत तक्रार दिली.

क्रेडिट कार्ड अपडेट करण्याची बतावणी करून सायबर चोरट्यांनी तरुणाची ३ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत २७ वर्षीय तरुणाने वाघोली पोलिसांत तक्रार दिली आहे. तरुण खासगी बँकेचे क्रेडिट कार्ड वापरतो. चोरट्यांनी तरुणाला संपर्क साधला. बँकेकडून क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांची माहिती गोळा केली जात आहे. तसेच, त्यांचे क्रेडिट कार्ड अपडेट केले जात असल्याचे सांगितले. त्यानूसार तरुणाकडून बँक खात्याची गोपनीय माहिती व क्रेडिट कार्डचा पासर्वड मिळवला. तसेच, त्याच्या खात्यातून ३ लाख ८० हजार रुपये स्वत:च्या खात्यात हस्तांतरित केले. वरिष्ठ निरीक्षक पंडित रेजितवाड तपास करत आहेत.

# मार्केट यार्डातील फळे - भाजीपाला विभागात दुचाकी, चारचाकी वाहनांना प्रवेश बंदी!



पुणे - मार्केट यार्डातील फळ-भाजीपाला विभागातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी बाजार समिती प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. बाजारात दुचाकी, चारचाकी वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. केवळ शेतीमाल घेऊन आलेल्या वाहनांनाच आता बाजारात प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

बाजार समितीवर संचालक मंडळ आल्यापासून मार्केट यार्डात तरकारी, गुळ-भुसार विभागात शेतमाल चोर्यांसह, तोडफोडीच्या घटना घडत आहेत. भरास भर म्हणजे वाहतुक कोंडीही कमी होत नव्हती. या पार्श्वभूमीवर सुरक्षा एजन्सी तीन वेळा बदलूनही सकारात्मक परिणाम झाला नाही. या पार्श्वभूमीवर बाजार समिती प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे.

बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, सचिव डॉ. राजाराम धोंडकर, संचालक अनिरूध्द ऊर्फ बाप्पू भोसले, सुदर्शन चौधरी यांच्यासह विभाग प्रमुखांची बैठक झाली. या बैठकीमध्ये प्रशासनाने वाहतुक कोंडी रोखण्यासाठी पहिले पाऊल उचलले आहे.

सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते १२ या वेळेत दुचाकी बाजारात सोडण्यात येत होत्या. त्या दुचाकी आणि चारचाकी गाड्यांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. या निर्णयामुळे वाहतुक कोंडी रोखण्यास मदत होणार का, हे येत्या काही दिवसात पाहायला मिळणार आहे.

# पोलिसांच्या हातावर तुरी; विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपी ससूनमधून पसार

पुणे । प्रतिनिधी

**वेगवेगळ्या गैर प्रकाराने सदैव चर्चेत असणाऱ्या ससून रुग्णालयात उपचारासाठी असलेला विनयभंग गुन्ह्यातील आरोपी हा नेमणुकीस असलेल्या पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. संतोष साठे (वय ५० वर्षे रा. म्हसोली ता. कराड, जि. सातारा) असे फरार झालेल्याचे नाव असून याबाबत त्याच्यावर बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांनी सांगितले की, बुधवारी (दि.२६) सकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी ससून हॉस्पिटल वॉर्ड क्र १८ येथे उपचारासाठी दाखल असलेला आरोपी संतोष साठे हा बंदोबस्तावर असलेल्या पोलीस अंमलदारांची नजर चुकवून पळून गेला आहे. त्याच्यावर कराड तालुका पोलीस स्टेशन येथे विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे.




या विनयभंगाच्या गुन्ह्यात येरवडा कारागृहात बंदिस्त असताना त्याच्या छातीत दुखू लागले. त्यामुळे त्याला मंगळवारी (दि.२५) ससून रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले होते. त्यावेळी कराड पोलीस स्टेशनचे दोन गार्ड कर्तव्यावर हजर होते. मात्र, त्यांची नजर चुकवून संबंधित आरोपी हा पसार झाला आहे. रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली असून संबंधित आरोपीचा माग काढण्यात येत आहे. याबाबत पुढील तपास बंडगार्डन पोलीस करत आहे.